# बिसेन डेन्टल केअर

**डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)**



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३२ | बुधवार,दि.१६ जुलै २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## अंमली पदार्थ कायद्यांतर्गत बाल गुन्हेगारांचे वय १६ करणार-मुख्यमंत्री

**मुंबई:**–अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यार्गत बालगुन्हेगाराचे वय दोन वर्षांनी कमी म्हणजेच १६ वर्षे करणे आणि बाल गुन्हेगाराला गुन्हा करण्यास प्रवृत्त करणाऱ्यालाही मुख्य आरोपी ठरविण्याबाबत सरकार विचार करीत असून लवकरच याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत दिली.

अंमली पदार्थ तस्करीत विदेशी गुन्हेगारांवरील गुन्हे मागे घेऊन त्यांना त्यांच्या देशात परत पाठविणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

छत्रपती संभाजीनगरात शालेय विद्यार्थांना अंमली पदार्थांचे व्यसन लावणाऱ्या टोळीवर कारवाई करण्याबाबत विलास भुमरे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान फडणवीस बोलत होते.

पोलीसांनी अंमली पदार्थ विरोधात धडक मोहीम उघडली असून प्रत्येक पोलीस ठाण्यात



अंमली पदार्थ विरोधी पथक नियुक्त करण्यात आले आहे. अंमली पदार्थ प्रकरणात वारंवार गुन्हा करणाऱ्या आरोपींवर आता मकोका लावण्यात येणार असून यासंदर्भातील विधेयकास नुकतीच मंजूरी देण्यात आली आहे.तसेच आंमली पदार्थ प्रकरणामध्ये नायजेरियन तसेच इतर विदेशी गन्हेगारांना त्यांच्या देशात परत पाठविण्यात अडचणी होत्या.

याबाबात केंद्र सरकारशी चर्चा झाली असून त्यांनी अशा विदेशी गुन्हेगारावरील गुन्हे माग घेऊन त्याना त्यांच्या देशात परत पाठविण्यास परवानगी दिली असून त्याबाबतची नियमावली केली जात असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

बालकांवरील लैगिंक अत्याचार प्रतिबंधक (पोस्को) कायदयामध्ये बाल गुन्हेगाराचे वय दोन वर्षांनी कमी करुन १६ वर्षे करण्यात आले आले आहे त्याच प्रमाणे आता अंमली पदार्थ तस्करीतही बालगुन्हेगाराचे वय कमी करण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## जिल्हा बँक अध्यक्षपदाची निवडणूक १९ जुलै रोजी;अध्यक्षपदी जैन यांची वर्णी निश्चित

**गोंदिया:**– गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक ३० जून रोजी पार पडली. एकूण २० संचालक पदांसाठी ही निवडणूक घेण्यात आली. यानंतर आता १९ जुलैला जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. त्यामुळे यासाठी आता मोर्चेबांधणीला वेग आहे.जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी सहकार पॅनलच्या संचालकाची वर्णी लागणार आहे. अध्यक्ष पदासाठी माजी आ. राजेंद्र जैन यांचे नाव निश्चित झाल्याची माहिती आहे. जिल्हा बँकेच्या निकालानंतर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांनीसुद्धा तसे संकेत दिले होते हे विशेष.

तब्बल १३ वर्षाच्या कालावधीनंतर जिल्हा बँकेची निवडणूक ३० जून रोजी पार पडली. या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने एकत्र येत सहकार पॅनल तयार करून निवडणूक लढविली. तर काँग्रेस आणि इतर पक्षांनी एकत्र येत परिवर्तन पॅनल तयार करून ही निवडणूक लढविली होती. एकूण २० संचालक पदांसाठी ही निवडणूक पार पडली. यात सहकार पॅनलचे ११ तर परिवर्तन पॅनलचे ९ संचालक निवडून आले. त्यामुळे जिल्हा बँकेवर सहकार पॅनलने वर्चस्व स्थापन केले. मात्र निवडणुकीनंतर दोन दिवसांनी परिवर्तन पॅनलच्या दोन संचालकांनी सहकार पॅनलला समर्थन जाहीर केले. त्यामुळे जिल्हा बँकेत सहकार पॅनलची ताकद अधिक वाढली आहे.संचालकपदाची निवडणूक पडल्यानंतर अध्यक्षपदाची निवडणूक केव्हा जाहीर होते याकडे लागल्या होत्या. यानंतर आता सहकार निबंधक कार्यालयाने जिल्हा बँक अध्यक्षपदाचा कार्यक्रम जाहीर केला असून १९ जुलै रोजी दुपारी १ ते ४:३० वाजता दरम्यान ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.



### विरोधकांकडून मोर्चेबांधणी

**जिल्हा बँक निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे ९ संचालक निवडून आले. मात्र यापैकी दोन संचालकांनी सहकार पॅनलला आपले समर्थन जाहीर केले. त्यामुळे परिवर्तन पॅनलच्या संचालकांची संख्या ७ वर आली आहे. पण यानंतरही त्यांनी अध्यक्षपदासाठी मोर्चेबांधणीला सुरुवात केल्याचे चित्र आहे.**

## सुहानीची अमेरीकेच्या आकाशात भरारी

देवरी– जद्द व मेहनतीच्या बळावर मोठ्यात मोठे शिखर गाठून यश प्राप्त करता येते, याची प्रचिती मुळची जिल्ह्यातील देवरी येथील व सद्या गोंदिया शहरातील रहिवासी असलेली सुहानी विजय अग्रवाल या विद्यार्थीनीने पुन्हा एकदा करून दिली आहे.लहानपणी पाहिलेल्या पायलट होण्याच्या आपल्या स्वप्नांना साकार करत सुहानीने थेट अमेरिकेच्या आकाशात झेप घेतली असून ऐतिहासिक कामगीरी करत गोंदिया जिल्ह्याच्या शिरपेक्षात मानाचा तुरा रोवला आहे.आदिवासीबहूल व नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे. त्यात जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर देवरी तालुका असून सुहानी अग्रवाल ही मुळची देवरी येथील रहिवासी आहे.

## नगरपरिषद, नगरपंचायत शाळांतील शिक्षक-कर्मचारी पेन्शन योजनेपासून वंचित-आमदार सुधाकर अडबाले

**गडचिरोली :** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानपरिषदेत नगरपरिषद व नगरपंचायतीतील शाळांमधील शिक्षक – कर्मचाऱ्यांच्या पेन्शन विषयक प्रश्नावर आमदार सुधाकर अडबाले यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे शासनाकडे मागणी केली. दरम्यान, मंत्री उदय सामंत यांनी उत्तरात पुढील एक ते दीड महिन्यांत ही फाईल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री (अर्थमंत्री) यांच्याकडे सादर केली जाईल आणि त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

३१ ऑक्टोबर २००५ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्तीवेतन योजना (डीसीपीएस) लागू करण्यात आली. राज्यातील महानगरपालिकेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देखील नगर विकास शासन निर्णय २२ फेब्रुवारी २०२२ अन्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (एनपीएस) लागू करण्यात आली आहे. मात्र, नगरपंचायत व नगरपरिषद शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना अद्याप कोणतीही पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नाही,ङ्ग असा मुद्दा आमदार सुधाकर अडबाले यांनी सभागृहात उपस्थित केला.

ते पुढे म्हणाले, सदर योजना ही अंशदानावर आधारित असून, कर्मचाऱ्यांचा हिस्सा आणि शासनाचा हिस्सा यावर पेन्शन मिळते. पण आज वीस वर्षे झाली तरीही या कर्मचाऱ्यांना कोणतीही पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नाही. दरम्यान, काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले, काहींचे निधन झाले, तरी त्यांच्या खात्यात एक रुपयाही जमा झालेला नाही. मागील अधिवेशनात देखील याबाबत शासन विचाराधीन असल्याचे उत्तर देण्यात आले होते आणि या वेळेसही तसेच उत्तर दिले गेले. हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत स्पष्ट निर्णय जाहीर करणार का? असा थेट सवाल अडबाले यांनी सरकारला केला.

या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री उदय सामंत म्हणाले, नोव्हेंबर २००५ पासून लागू करण्यात आलेल्या अंशदान निवृत्तीवेतन योजनेला केंद्र शासनाच्या नवीन निवृत्तीवेतन योजना (एनपीएस) मध्ये २०१५ पासून संलग्न करण्यात आले आहे. यासंदर्भात वित्त विभागाने संबंधित निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. ही फाईल मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री (अर्थमंत्री) यांच्याकडे सादर केली जाईल आणि त्यावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले.

## शासकीय रक्तपेढीची दुरावस्था, सुधारणा केव्हा करणार

**गोंदिया :-** जिल्ह्यातील रक्तदात्यांना आधार देणारे महत्त्वाचे केंद्र असलेल्या येथील बाई गंगाबाई शासकीय रक्तपेढीची अत्यंत दुरवस्था झाली आहे; पण अद्यापही रक्तपेढीची इमारत आणि तेथील सोयीसुविधांकडे लक्ष दिले जात नसल्याने ही रक्तपेढी विविध समस्यांनी ग्रासली आहे. लवकरच येथे रक्ताचे विविध घटक वेगळे करून गरजूंना जीवनदायी मदत करणारे मकॉम्पोनंट सेपरेशन युनिटफ सुरू होणार; पण रक्तपेढीच्या दुरवस्थेमुळे यावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

येथील रक्तमित्र विनोद चांदवानी यांनी नुकतीच या ब्लड बँकेला भेट दिली असता अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. भिंतींना पूर्णपणे वाळवी लागलेली असून इमारत जीर्ण झाली आहे. रक्तदात्यांसाठी नीट स्वच्छ व सन्मानजनक बसण्याची व्यवस्था नाही.

गेल्या कित्येक वर्षांपासून या इमारतीची रंगरगोटी अथवा दुरुस्ती करण्यात आली नाही. संपूर्ण परिसर दुर्लक्षित, अस्ताव्यस्त आणि बेवारस अवस्थेत. या रक्तपेढीत लवकरच कॉम्पोनंट सेपरेशन युनिट सुरू करण्यात येणार आहे. या युनिटच्या माध्यमातून रक्ताचे घटक (जसे प्लेटलेट्स, प्लाझ्मा, लाल पेशी) वेगळे करून गरजू रुग्णांना वेळेत पोहोचवण्याची सुविधा निर्माण होणार आहे. मात्र, ज्या इमारतीत हे युनिट सुरू करायचे त्या ठिकाणीच स्वच्छता आणि विविध सोयीसुविधांचा अभाव आहे.



### याकडे लक्ष देण्याची मागणी

**शासकीय रक्तपेढीच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती करून वाळवी नियंत्रण करावे. संपूर्ण परिसरात स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि रंगरंगोटीची कामे त्वरित करण्यात यावी. रक्तदात्यांना सन्मानपूर्वक, सुरक्षित बसण्याची व नोंदणीची व्यवस्था करावी. कॉम्पोनंट सेपरेशन युनिट सुरू करताना सर्व आवश्यक मानकांचे काटेकोर पालन करावे**

## महिला लोकशाही दिन २१ जुलै रोजी

**गोंदिया :** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन साजरा करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी २१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनामध्ये सर्व महिला कर्मचारी, महिला मंडळ, बचतगट व इतर महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येवून वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात.

न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी, तक्रार/निवेदने वैयक्तीक स्वरुपाचे नसेल तर ते अर्ज स्विकारण्यात येणार नाही. तरी सर्व पिडीत महिलांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात व्यक्तीश: येऊन आपली तक्रार तीन प्रतीत सादर करावी. अर्जाचा नमूना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, खोली क्र.३६, जयस्तंभ चौक, गोंदिया या कार्यालयात नि:शुल्क प्राप्त होईल.

## त्या नराधमाला २४ तासाच्या आत अटक करा

**भंडारा :-** जिल्ह्यातील साकोली येथील श्याम हॉस्पिटल चे डॉक्टर देवेश अग्रवाल यांनी ०९ जुलै २०२५ ला श्याम हॉस्पिटल मधे आरोग्य तपासणी करिता गेलेल्या बौद्ध समाजातील अल्पवयीन मुलीवर सोनोग्राफी तपासणी च्या नावावर अश्लील वर्तन व चाळे करून अन्याय (विनयभंग) करत बलात्कार ही केला. याबाबत पीडित मुलीच्या आई वडिलांनी साकोली पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. तक्रारी वरून डॉ.देवेश अग्रवाल यांच्या विरुद्ध पोक्सो (झजउडज) सह विनयभंग व एट्रोसिटी चा गुन्हा दाखल केलेला आहे. घटनेला ५ दिवस उलटून ही आरोपी डॉक्टर ला अटक झाली नसून आरोपी घटनेच्या दिवसापासून फरार आहे. या घटनेमुळे जनतेत प्रचंड रोष व असंतोष पसरलेला आहे. या घटनेच्या संदर्भात फुले शाहू आंबेडकरवादी चळवळीतील सामाजिक/राजकीय कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षकांची भेट घेतली.

२४ तासाच्या आत आरोपीला अटक करण्यात यावे।दवाखाना सील करण्यात यावा, पीडित मुलीचा सोनोग्राफी करत असतानाचा वैद्यकीय रूम मधला सीसीटीव्ही फुटेज तात्काळ तपासात घेण्यात यावा, रुग्णालयात काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची साक्ष ही डॉक्टरच्या बचावासाठी असल्याने ग्राह्य मानल्या जाऊ नये, पीडित मुलीवर अन्याय करणाऱ्या आरोपी डॉक्टर चालवत असलेल्या श्याम हॉस्पिटल



साकोली ची केंद्रीय तथा राज्य मेडिकल कौन्सिल ची नोंदणी तात्काळ रद्द करण्यात यावी, सदर घटनेचा तपास सी.आय.डी व सी.बी.आय सारख्या गुप्तचर यंत्रणेच्या निष्पक्ष अधिकाऱ्याकडे सोपविण्यात यावा, सदर घटनेचा खटला हा जलदगती न्यायालयात चालविण्यात यावा, आरोपी डॉक्टर देवेश अग्रवाल व रुग्णालयातील साक्ष देणाऱ्या सहकर्मचाऱ्यांची नार्को टेस्ट करण्यात यावी, आरोपी डा देवेश अग्रवाल व त्याचा परिवार हा गर्भश्रीमंत असल्याने समाजातील काही लोकांच्या माध्यमातून पीडित मुलीला व तिच्या परिवाराला आर्थिक प्रलोभन व इतर आमिष देऊन सदर प्रकरणाला प्रभावित करून पीडित मुलीला व तिच्या परिवाराला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने पीडित मुलीला व तिच्या परिवाराला तात्काळ संरक्षण देण्यात यावे, दवाखान्यात काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांचे हजेरीचे रजिस्टर आणि घटनेच्या दिवशी रुग्णालयात सेवारत असलेल्या कर्मचाऱ्यांचे हजेरीचे नोटबुक तात्काळ तपासात घेण्यात यावे, आरोपीच्या परिवारातील लोकांचे मोबाईल जप्त करून, तपासात घेऊन CDR घेण्यात यावा, सदर गुन्हा दाखल होत असतानाच गुन्ह्याची नोंद करणाऱ्या स्टेशन डायरी अंमलदार यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला फोन द्वारे माहिती देऊन आरोपी डॉ.देवेश अग्रवाल याला गुन्ह्याची माहिती देऊन फरार होण्यास मदत केल्यामुळे स्टेशन डायरी अंमलदार सह त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, अशा विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक यांना देण्यात आले.

सदर मागण्यांवर २४ तासात कार्यवाही न झाल्यास तीव्र जनआक्रोश करण्यात येईल, असा इशारा देखील निवेदनाच्या माध्यमातून फुले शाहू आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्ते व विविध सामाजिक/राजकीय/धार्मिक संघटनांनी दिला.

यावेळी रिपब्लिकन सेनेचे अचल मेश्राम, मनोज खोब्रागडे, काँग्रेस चे मनोज बागडे, रिपब्लिकन पक्षाचे असित बागडे, क्रांतीज्योती महिला संघटना चे अश्विनी भिवगडे, आझाद समाज पार्टी चे दिपक जनबंधु, राजेश मडामे, ग्यानचंद जांभूळकर, अश्विन गोस्वामी, अमोल भिवगडे, संतोष उकणकर, भारतीय बौद्ध महासभेचे हरकर उके, सुरेंद्र बनसोड, समता सैनिक दलाचे श्रीराम बोरकर, बिआरएसपी चे राष्ट्रपाल नाईक, भीम आर्मी चे विक्रांत भालाधरे, बायोबी चे मृणाल गोस्वामी, विनय बनसोड, वंचित बहुजन आघाडीचे डी.जी.रंगारी, तनुजा नागदेवे, महामाया महिला सामाजिक न्याय संघटनेचे शितल नागदेवे, साहित्यिक डॉ.सुरेश खोब्रागडे, नासिक चवरे, भद्राकात्यायनी महिला मंडळाचे जया शिंगाडे, कल्पना ढोके, कीर्ती गणवीर, सुरेश खंगार, विलास नागदेवे, विशाखा वाहने, साधना लाडे, शांता नेपाळे, शीतल डोंगरे, चिंतामण बोरकर, भाऊ कातोरे, हंसराज वैद्य, रुपचंद रामटेके, मंगलदास तिरपुडे, संजय रामटेके, मंजुषा चव्हाण, कविता सरादे, वर्षा सुखदेवे, आदी बहुसंख्य कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## सेवानिवृत्त समाजकल्याण उपायुक्तांचे ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या साहित्यांचे वस्तुसंग्रहालय !



**खेमेंद्र कटरे,**

**गोंदिया**–विविध प्रकारच्या जुन्या दुमिर्ळ वस्तू जमवण्याचा छंद मात्र फारसा कुणाला माहिती नाही. नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यानंतर घरसंसार सांभाळत, गेले काही वर्षापासून अनेक पुरातन वस्तूंचा खूप मोठा संग्रह सेवानिवृत्त समाजकल्याण उपायुक्त अनिल देशमुख यांनी केला आहे.विशेष म्हणजे त्यांनी गडचिरोली येथे कार्यरत असताना आदिवासी समाजात उपयोगात येणाऱ्या अनेक पारंपारिक वस्तुंचाही संग्रहालय गडचिरोली येथील घरी यापुर्वी केलेला आहे.

त्यातच इतर अनेक व्याप सांभाळण्याची कसरत करत असतानाच, एखादी आपल्या आवडीची गोष्ट किती नेटकी आणि परिपूर्णपणे करता येऊ शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.स्वातंत्र्यपूर्व काळातील गावात बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदारांनी आपल्या कौशल्यातून माती, लाकूड, बांबू, लोखंड आणि जंगलातील विविध उत्पादनांचा वापर करून जीवनोपयोगी वस्तू तयार केल्या. विजेच्या अभावातही त्यांनी गोल लाकडी चाक,दळणवळणाची साधने, शेतीची अवजारे, घरगुती वापराच्या वस्तू अशा अनेक गोष्टी आपल्या हस्तकौशल्यातून निर्माण केल्या. या कारागिरांनी गावांना स्वयंपूर्ण आणि समृद्ध बनवले. मात्र, आज या वस्तू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. येणाऱ्या पिढ्यांना या वस्तूंचा वारसा लाभावा, यासाठी सेवानिवृत्त उपायुक्त अनिल देशमुख यांची धडपड सुरू आहे.

### वस्तुसंग्रहालय उभारण्याचे स्वप्न

**गोंदिया-भंडारा जिल्ह्यांतील नवेगाव-नागझिरा अभयारण्यामुळे देशी-विदेशी पर्यटक मोठ्या संख्येने येतात. मात्र, जिल्हा मुख्यालयात पर्यटकांसाठी विशेष आकर्षण नाही.त्यामुळे गोंदिया शहरात जागतिक दर्जाचे शासकीय वस्तुसंग्रहालय उभारावे, अशी अनिल देशमुख यांची इच्छा आहे. त्यांनी आपला सर्व संग्रह देणगी स्वरूपात देण्याची तयारी दर्शवली आहे.या वस्तू गोंदिया, भंडारा, शिवनी आणि बालाघाट परिसरातून गोळा केल्या आहेत. देशमुख यांचा या मागील उद्देश ५० वर्षांपूर्वीच ग्रामीण संस्कृतीची ओळख ही या माध्यमातून नव्या पिढीला घडविण्याची आहे. या वस्तूंचे दर्शन घडवून, त्यांच्या माध्यमातून आपल्या सांस्कृतिक वारशाची जाणीव करून देणे, हा आहे. जवळपास ८०० जुन्या ग्रामीण संस्कृतीशी निगडित वस्तूंचा संग्रह करण्याचा त्यांचा मानस आहे.**



सेवानिवृत्त समाजकल्याण उपायुक्त अनिल ग्यानीरामजी देशमुख यांनी गेल्या दहा वर्षांत जवळपास ३०० दुर्मीळ ग्रामीण वस्तूंचा संग्रह केला आहे.

त्यांच्या या वस्तुसंग्रहालयात खाचर,बैलगाडी,नांगर,पाण्याची मोट(चामड्याची) स्वयंपाकाची जुनी भांडी, जुने जरीचे कपडे, शंख, कुलपे, अडकित्ते, पूजेची भांडी, शेती आणि बागकामाची अवजारे, इस्त्री, फिरकीचे तांब्ये,जुने रेडिओ, फोनो, पत्ते, घड्याळे, दळणाचे मोठे जाते आणि त्याखालील पीठ जमा करण्याचा लाकडी स्टॅन्ड, तीर्थ झाऱ्या, दिवे, दौती – टाक, सांडशी हे त्या वस्तूंचे काही प्रकार आहेत. त्यांच्या उपहारगृहात शिरतानाच त्यांनी अनेक जुन्या वस्तू तेथे मांडल्या आहेत.त्यांच्या या संग्रहालयात रोजच्या दैनिक जिवनात वापरले गेलेले साहित्य ठेवले आहे हे विशेष !हा संपूर्ण संग्रह येथील एका वेगळ्या खोलीमध्ये सर्वांना पाहण्यासाठी मांडला आहे.

### या वस्तू केल्या आहेत संग्रहित

**नांगर, वखर, कोहपर, सुरकुडा, ढेकणी, बैलबंडीचे चाके, घोड्याची बग्गी, खाचर, रेहका, छेकडा, छाटी, बैलबंडी अगदी सुरुवातीच्या काळात वापरलेले चाक, धीर, मोर, मोऱ्या, सतोडी, बांबूचे फाटक, मातीच्या वेगवेगळ्या चुली, पुरातन काळातील भांडी, मुसळ, जाते, लाकडी चमच, मातीचे दिवे, मातीची खेळणी यासह अनेक जुन्या दुर्मीळ वस्तूंचे त्यांनी जतन करून ठेवले आहे. विविध भागाला भेटी देऊन जुन्या ग्रामीण संस्कृतीची ओळख पटवून देणाऱ्या वस्तू कुठे मिळतात का, यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू आहे.**

हे संग्रहालय त्यांनी सर्वांसाठी खुले केले असून ते अवश्य पाहण्यासारखेच आहे.या संग्रहालयातील सर्व पुरातन आठवणी जपणार्या वस्तू सरकारला देण्याची त्यांची इच्छा असून सरकारने गोंदियात पुरातन वस्तुंचा संग्रह असलेला वस्तुसंग्रहालय तयार करावे अशी अनिल देशमुख यांची इच्छा आहे.त्याकरीता त्यांना शासन प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावाही केला आहे.

उद्योग जगतातील खूप मोठे उद्योगपती टाटा आणि गोदरेज यांच्या सारख्यांनी अत्यंत मौल्यवान अशा अनेक गोष्टींचे संग्रह केलेले आहेत.



हॉटेल व्यावसायिक विठ्ठल कामत हे खूप मोठे संग्राहक आहेत. तसेच पुण्याच्या पु.ना.गाडगीळ या प्रतिष्ठित आणि प्रसिद्ध सराफ पिढीचे अजित गाडगीळ यांनी तर कोट्यवधी रुपये खर्च करून झपूर्झा हे जागतिक दर्जाचे संग्रहालय उभारले आहे.

या संग्रहालयासोबतच विदर्भ व मध्यप्रदेशातील(बालाघाट,सिवनी,छिंदवाडा)भागातील ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारे संग्रहालय तयार करण्याकरीता आणि त्या संग्रहालयात वस्तूंच्या शोधाकरीता देशमुख हे सातत्याने फिरत असतात.

कुणाला जुनी नाणी तर कुणाला पेन व इतर वस्तू संग्रह करण्याचा छंद असतो; पण ज्या काळात वीज नव्हती, आधुनिक सोयीसुविधा नव्हत्या तेव्हा लोक आपल्यातील कलाकुसर वापरून त्यावर कसे मात करीत होते. त्यांनी तयार केलेल्या वस्तु आजही त्या काळातील ग्रामीण कला संस्कृतीचे जिवंत दर्शन घडविते, हे भावी पिढीला कळावे, त्यांना या ग्रामीण संस्कृतीची ओळख व्हावी, यासाठी मूळचे गोरेगाव येथील रहिवासी असलेले व सध्या गोंदियात स्थायिक झालेले सेवानिवृत्त समाजकल्याण अधिकाऱ्याची धडपड ही ५० वर्षापूर्वीच्या ग्रामीण भारताच्या खुणा जपण्यासाठी ते या वस्तूंचा संग्रह करून त्याचे संग्रहालयात रूपांतर करण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

## संपादकीय

# छत्रपतींच्या किल्ल्यांचा आंतरराष्ट्रीय गौरव

युनेस्कोच्या समितीकडून महाराष्ट्रातील १२ गड किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आले आहे आणि यासंबंधींची घोषणा नुकतीच राज्य सरकारकडून करण्यात आली. ही घोषणा समस्त मराठी जनांच्या आणि महाराष्ट्रीय यांची छाती गर्वाने भरून टाकणारी आहे यात काही शंका नाही. कारण महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांनी आपल्या दूरदर्शी धोरणाने आणि व्यापक हित लक्षात घेऊन महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापले. त्यांचे जतन आता होणार आहे आणि यामुळे ही बाब निश्चितच प्रत्येक महाराष्ट्राभिमानी मनाला रोमांचित करणारी आहे. महाराष्ट्रातील ११ किल्ले ज्यात रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग तसेच खांदेरी यासह तामिळनाडूतील जिंजी या किल्लयांचा युनेस्कोच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.यावरुन मराठ्यांचे साम्राज्य दक्षिणेपर्यंत विस्तारीत होते,हे या किल्यांवरुन दिसून येते.

या १२ किल्लयांना जागतिक वारसास्थळ म्हणून जाहीर करण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेले आहेत पण या किल्लयांचे एक ऐतिहासिक महत्त्वही आहे. कारण ते प्रत्येक स्वराज्यातील महत्त्वपूर्ण घटनेचे साक्षीदार आहेत. छत्रपती शिवरायांनी स्वराज्य निर्मिती आणि रक्षणासाठी ज्या अनेक किल्लयांची उभारणी केली आणि त्यांच्या जोरावर मुघल साम्राज्याला टक्कर दिली आणि बलदंड मुघल साम्राज्याला पाणी पाजले त्या किल्लयांचा समावेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीत होणे ही प्रत्येक भारतीयासाठी निश्चितच गौरवास्पद बाब आहे. यात तामिळनाडूतील जिंजी हे एक ठिकाण आहे हे तामिळनाडूतील असले तरीही छत्रपती शिवरायांशी जवळून संबंधित आहे. त्यामुळे त्याचा या यादीत समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील किल्ले हे स्थापत्य कलेसाठी ओळखले जातात आणि राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही हे किल्ले एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. शत्रूच्या नजरेस न येता त्यांचे स्थापत्य असे विलक्षण आहे की, त्यामुळे भल्याभल्यांची मती गुंग व्हावी. शिवरायांच्या राजकीय चातुर्यास ज्याला ॲक्युमेन म्हटले जाते त्याला दाद द्यावी की, स्थापत्यकलेच्या आविष्कारास दाद द्यावी असा प्रश्न पडतो. यातील प्रत्येक किल्ला हा मराठा दुर्ग शास्त्रातील अभूतपूर्व चमत्कार आहे आणि त्याची माची, तटबंदी, बुरूज, दरवाजे आणि खंदकानी सुरक्षित केले आहेत. त्यातच शिवरायांच्या युद्धकौशल्याचा आणि राजकीय डावपेचांचा प्रचंड आविष्कार दिसून येतो.

अर्थात हे होण्यासाठी राज्यसरकारने काटेकोर नियोजन केले यात काही शंका नाही. कारण राज्यसरकारने अत्यंत काटेकोरपणे अभ्यास करून प्रस्ताव युनेस्कोच्या आणि भारतीय पुरातत्त्व खात्याच्या वस्तुसंग्रहालय संचालयाकडे पाठवला आणि त्यानंतर युनेस्कोच्या तज्ज्ञांनी या किल्लयांची पाहणी केली आणि काळजीपूर्वक तपासणी केल्याअंती या १२ किल्लयांना जागतिक वारसा यादीत समाविष्ट केले.


अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राज्यातील अभ्यासकांशी सातत्यपूर्ण असलेला संवाद आणि महाराष्ट्रातील या किल्लयांना नामांकन मिळावे म्हणून त्यानी केलेला पाठपुरावा याला अखेर यश मिळाले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी युनेस्कोकडे सातत्याने जाऊन पाठपुरावा केला. त्यामुळे हे यश मिळाले. नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा राज्यासाठी अभिमानाचा गौरवशाली क्षण आहे असे जे म्हटले ते कुणीच अनाठायी नाही असे कुणीच म्हणू शकणार नाही. कारण शिवरायांचे हे किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाले यात संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव झाला आहे. रायगड हा तर महाराष्ट्रीयांचा मानबिंदू आहे तर राजगड, प्रतापगड हेही किल्ले शिवरायांच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देतात. शिवनेरी तर शिवरायांचे जन्मस्थान आहे.

त्यामुळे हे प्रत्येक किल्ले शिवरायांच्या जीवनातील महत्त्वाच्या क्षणांचे साक्षीदार आहेत, त्यांचे जतन करणे महत्त्वाचे आहेच, पण आता तर ते जागतिक वारसायादीत समाविष्ट झाले असल्याने त्यांचा गौरव वाढला आहे. आपलाही गौरव वाढला आहे. मुख्यमंत्री फडणवीस त्याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसायादीत आल्याबद्दल प्रत्येक नागरिकाचे अभिनंदन केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तो क्षण जितका महत्त्वाचा होता तितकाच आजचा आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन करू तितके कमी आहे. आता या किल्लयांची जपणूक आणि जतन करायला हवे आणि तेथील ऐतिहासिक वारशांचे जतन करायला हवे. हे तितके सोपे नाही. कारण खरी जबाबदारी जतन करण्याचीच असते.

आता खरी जबाबदारी आहे ती आपली. कारण आपल्याकडे लोक ऐतिहासिक स्थळी पर्यटनाला जातात ते निव्वळ मजा करण्यासाठी. तेथे अनेक नको असलेल्या गोष्टी पडून असतात आणि ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी कसे वागावे आणि कशी वर्तणूक असावी याचे शिक्षण आपल्याला दिले जात नाही. त्यामुळे आपण जातो तेथे त्या स्थळाला अवकळा आणतो. अगदी रायगडावरही अस्वच्छता पसरलेली असते आणि दरवर्षी आपल्याकडे काही संस्था तिथे जाऊन स्वच्छता करतात. त्याना असे करण्याची वेळ येऊ नये. इंग्लंडने आपल्यावर राज्य केले म्हणून त्यांना आपण शत्रू मानतो, पण त्यांनी आपल्याकडील ऐतिहासिक स्थळांसाठी काय काय केले, तर आपण त्याच्या जवळही नाही हे खरे आहे. कारण इंग्लंडचा विंडसर कॅसलला अद्याप वारसा स्थळाचा दर्जा मिळाला नाही तरीही त्यांची प्रजा त्याचे जतन करण्यासाठी जे प्रयत्न करतात त्यांचे कौतुक करायला हवे. तीच प्रवृत्ती आपल्यातही अंगी बाणवायला हवी.


इतिहास हा केवळ त्याचा गौरव करून टिकत नाही, तर त्याचे प्रजाजन किती इतिहासातील वस्तूंचे जतन करतात आणि पालन करतात यावर टिकत असतो. त्याबाबतीत राज ठाकरे यांनी एक इशारा दिला आहे. राज यांचे म्हणणे आहे की, युनेस्कोने दर्जा दिला म्हणून वास्तूचे जतन करण्याची जबाबदारी संपते असे नाही, तर ओमानमधल्या आयरीस अभयारण्य या स्थळाचा जागतिक दर्जा युनेस्कोने काढून घेतला. तसे होऊ नये म्हणून युनेस्कोच्या दर्जाबद्दल जल्लोष साजरा करतानाच आपण आपल्याकडून या स्थळाचे पावित्र्य भंग पावणार नाही याची दक्षता प्रत्येक पर्यटकाने घेतली पाहिजे. ही जबाबदारी आपल्यावर मोठी आली आहे.

### हनुमंतीताई शेंडे यांचे निधन



**गोंदिया:–** गोंदिया जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष ॲड.के.आर.शेंडे यांच्या पत्नी व दि. महिला अर्बन बँकेच्या माजी संचालक तसेच श्री चक्रधर बहुउद्देशीय शिक्षण व विकास संस्था गणेशनगर गोंदियाचे कोषाध्यक्ष धर्मपत्नी हनुमंतीताई शेंडे यांचे १४ जुर्लेला दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर आजा १५ जुर्ले रोजी अंत्यसंस्कार येथील मोक्षधामा येथे करण्यात आले. त्यांच्या मागे बराच मोठा आप्त परिवार आहे.

### कुलदीप रिनायत यांचे निधन



**गोंदिया:–** येथून जवळच असलेल्या मुर्री येथील सामाजिक कार्यकर्ते व शिवसेना नेता कुलदीपजी रिनायत यांचे आज १५ जुलै रोजी हृदयविकाराच्या आघाताने निधन झाले. त्यांच्यावर मुर्री येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# जन सुरक्षा की जन नियंत्रण?

महाराष्ट्र जन सुरक्षा कायद्यावरसंविधानवादी प्रतिवाद सुरक्षा हवीच, पण स्वातंत्र्य गमावून नव्हे! महाराष्ट्र विधिमंडळात सादर करण्यात आलेल्या व नुकत्याच पारीत करण्यात आलेल्या “जन सुरक्षा विधेयक २०२४’ (The Maharashtra Public Security Act) ने राज्यातील नागरिक स्वातंत्र्यांवर गदा आणली आहे. या कायद्याचा मूळ उद्देश म्हणजे ङ्गसार्वजनिक सुव्यवस्था राखणे,ङ्ग पण त्यामागे सत्तेतील लोकांच्या नियंत्रणवादी आणि नागरिकद्वेषी मनोवृत्तीचे बीज स्पष्ट दिसते आहे.

हा केवळ एक कायदा नाही, तर एक विचारसरणी आहे – जी “सुरक्षे’च्या नावाखाली लोकशाहीच्या मुळांवर घाव घालते. हे विधेयक फक्त काही कलमांचे संकलन नाही; तर ते व्यक्तिस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि एकंदर लोकशाही संपवण्याचे कारस्थान आहे हे नीट लक्षात घ्यायला हवे.

विधेयकाचा सारांश (मुख्य कलमांवर एक नजर)

१. संशयास्पद व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाईफ करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांना

२. सार्वजनिक शांततेला धोकाफ निर्माण करणाऱ्या व्यक्तींना निवारणाशिवाय तडीपार करता येणे

३. व्यक्ती किंवा गटांवरप्रतिबंधात्मक नजरकैद, नजरबंदी

४. फेसबुक, सोशल मीडिया पोस्ट्सवरील कारवाईचे अधिकार

५. जनतेच्या मनात अस्वस्थता, सरकारविरोधी भावना निर्माण करणाऱ्याफ कार्यकर्त्यांवर नजर ठेवण्याची तरतूद

हे वाचताच मनात येते – हे काय भारतीय राज्यघटनेचे मुल्याधिष्ठान असलेले विधेयक आहे की बिर्सा मुंडा, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना “अराजकवादी’ ठरवणाऱ्या ब्रिटिश राजवटीचे पुनरागमन?

घटनात्मक मूल्यांशी विसंगती

१. कलम १९: अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा कापणारे विधेयक: भारतीय संविधानाच्या कलम १९(१)(र) नुसार प्रत्येक नागरिकास अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. हे विधेयक मात्र त्या अभिव्यक्तीला अराजक ठरवून तिला शिक्षा करण्याचा मार्ग मोकळा करते. एखादा समाजकार्यकर्ता सरकारच्या धोरणावर टीका करतो, तर त्याला ङ्गसार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात घालणाराफ ठरवले जाते.

२. कलम १४ आणि २१: समानता व वैयक्तिक स्वातंत्र्य: ङ्गमाझ्या इच्छेने मी कुठे जाईन, कुणाला भेटेन, काय बोलेनफ यावर नियंत्रण हे संविधानाच्या मूलभूत हक्कांच्या विरोधात आहे. पण या कायद्याने पोलीस आणि जिल्हाधिकाऱ्यांना अशा व्यक्तींना गावाबाहेर पाठवण्याचा किंवा नोकरीपासून दूर ठेवण्याचा अधिकार दिला आहे.

इतिहासातील सावधानतेचे संकेत

१. ब्रिटिशकालीन मरॉलेट कायद्याफची आठवण:

१९१९ मध्ये ब्रिटिशांनी “रॉलेट ॲक्ट” आणला होता, ज्याने कोणत्याही आरोपांशिवाय भारतीयांना अटक करता येत होती.

आजच्या “जन सुरक्षा विधेयका’ मधील प्रतिबंधात्मक अटक, निवारणाशिवाय तडीपार, ही त्या काळाचीच आधुनिक आवृत्ती वाटते.

२. आपात्कालीन (एाशी–सशपलू) काळातील दडपशाही:

१९७५ च्या आणीबाणीच्या काळात जेव्हा “राष्ट्रसुरक्षेसाठी” पत्रकार, साहित्यिक, आंदोलक यांना जेलमध्ये टाकण्यात आलं, तेच आता जन सुरक्षेच्या नावाखाली पुन्हा घडताना दिसते.

जागतिक संदर्भ: लोकशाहीत अशा कायद्यांना हरकत घेणारे जागतिक ठराव

१. युरोपियन युनियनमध्ये मानवाधिकार आयोग अशा कायद्यांना प्रतीबंधात्मक (Preventive Oression) ठरवतो.

२. णछ र्कीरप ठळसहीं र्ऊीपलळश्र ने असे स्पष्ट केले आहे की “Public order laws must not override fundamental freedoms.”

३. US Sureme Court (Brandenburg v. Ohi) मध्ये ठरवले की, केवळ सरकारविरोधी विचार मांडल्यामुळे व्यक्तीला गुन्हेगार ठरवता येत नाही.

काय आहेत विधेयकाचे संभाव्य धोके?

* पत्रकारांवर गुन्हे दाखल
* कार्यकर्त्यांना तडीपार
* विरोधकांवर राजकीय सुडभाव
* निषेध मोर्च्यांचे दमन
* सोशल मीडियावर पोस्ट करणाऱ्यांवर गुन्हे

लोकशाहीतील वैचारिक संघर्ष “आवाजाने’ होतो. आता तो “तडीपाराने’ होईल का?

संविधानवादी प्रतिवाद: विरोध करणे ही जबाबदारी

कायद्याच्या राज्यात सरकार लोकांचे सेवक असते, मालक नाही. सरकारविरोधी टीका करणे, लोकांना त्यांच्या हक्काबाबत जागरूक करून लोकांतील अस्वस्थतेला वाचा फोडणे ही पत्रकार, लेखक, साहित्यिक, लोककलावंत यांची जबाबदारी असते. अशाप्रकारच्या विरोधातूनच लोकशाही अधिकाधिक समृद्ध होत असते, विकसित होत असते.

हा कायदा लोकांना संशयाच्या नजरेने पाहतो. ही “Presumtion of Innocence” च्या तत्त्वाला दिलेली थेट तिलांजली आहे.

मग, आता आपण काय करावे?

* या कायद्याला लोकशाही विरोधी ठरवणे गरजेचे आहे.
* जागरूक नागरिक, वकील, पत्रकार, कार्यकर्ते, विद्यार्थी यांनी विरोधाचे सूर लावणे अत्यावश्यक आहे.
* राज्यपालांनी हे विधेयक राज्यसभागृहात पुनर्विचारासाठी परत पाठवावे.
* घटनेच्या चौकटीत राहून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा मार्गही खुला आहे.

जनतेसाठी कायदा की जनतेवर कायदा व जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा?

* जन सुरक्षा कायदा हा “जन दमन कायदा’ आहे.
* हा कायदा नाही, हा लोकशाहीची वाट लावणारा हुकूमशाही फतवा आहे.

चुप्पी तोडो

“क्रांतीची तलवार ही विचारांच्या सहानेवर परजली जाते” असे शहीद भगतसिंग सांगतात. जगातल्या सगळ्या बदलामागे विचार आहे. जगातले सगळे बदल अभिव्यक्ती स्वातंत्र्यंतूनच जन्माला आले आहेत. महाराष्ट्रतील स्वराज्याची क्रांतीदेखील शहजीराजे–जिजाऊ–शिवबा यांच्या शोषणविरोधी व समतावादी विचारांतून घडली, हा गौरवशाली इतिहास आपल्याकडे आहे. आज त्याच महाराष्ट्रात सर्वसामान्यांचा आवाज दाबू पाहणारा कायदा येऊ घातला आहे.

स्वातंत्र्य हे सैनिकांच्या रणभूमीतील बळासोबतच विचारवंतांच्या लेखणीवर आणि कार्यकर्त्यांच्या रक्तावरही कोरले गेले आहे. आज तो इतिहास पुन्हा रचायचा की नष्ट करायचा, हा निर्णय आपल्या “निबंधित आवाजा’च्या ऐवजी “निर्भीड विचारां’वर अवलंबून आहे. म्हणून निर्भिडपणे बोलूया, व्यक्त होवूया, बोलणाऱ्यांवर, लिहिणाऱ्यांवर, व्यक्त होणाऱ्यावर निर्बंध आणणाऱ्या कायद्याला सर्व लोकशाही मार्गाने विरोध करूया.

**ॲड. शीतल शामराव चव्हाण**
(मो. ९९२१६५७३४६)

## सुकडी प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाली रुग्णवाहिका



**तिरोडा:–** तालुक्यातील सुकडी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत रुग्णांना चांगली रुग्णसेवा मिळावी तसेच रुग्णांना आरोग्य केंद्र व इतर रुग्णालयात ने–आण करण्याकरिता रुग्णवाहिकेची गरज लक्षात घेत सुकडी जिल्हा परिषद क्षेत्राचे सदस्य जगदीश बावनथडे यांनी सुकडी प्राथमिक आरोग्य केंद्राला आपल्या प्रयत्नातून रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली.

या रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा नुकताच जि.प.सदस्य बावनथडे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दर्शना नंदागवळी, पंचायत समिती सदस्या कविताताई सोनेवाने, सौ.आर.आर.पारधी, सौ.कनकलता काळे, सरपंच सुनील मेश्राम,उपसरपंच संदीप कुर्वे, आलेझरी सरपंच पुष्पलता गौतम, सुरेश रायकर, प्रशांत ओके, हर्षवर्धन मेश्राम, पारस बावनथळे, डॉ. शिवकुमार हरिणखेडे, पी.एल राऊत, छाया घाबरडे, अर्चनाताई उके, पल्लवी रामटेके, मीनाक्षी बघेले, राधेश्याम पिंपळकर, दुर्गेश्वरी कळम, योगेश गुनेरिया, सुनील भाले, तेजस गुरव, मा. संजय लिल्हारे, डॉ.लक्ष्मी पटले व क्षेत्रातील गावातील नागरिक मोठ्या संख्येने रुग्णवाहिकेच्या लोकार्पण सोहळ्या प्रसंगी उपस्थित होते.

## बसस्थानकासमोरील दुभाजक ठरतो धोकादायक



**चित्रा कापसे**

**तिरोडा:–** स्थानिक तिरोडा येथील बसस्थानकासमोर रस्त्यावर तुटलेले दुभाजक अपघाताला निमंत्रण देत आहेत. या मार्गावरून दररोज शेकडो वाहनांची वदर्ळ असते. मात्र, कोट्यवधी रुपये खर्चुन बनवलेले दुभाजक निकृष्ट दर्जाचे असून, त्याच्या दुरवस्थेमुळे रस्त्यावर अडथळा निर्माण होत आहे. नागरिकांनी या दुभाजकांची त्वरित दुरुस्ती करण्याची जोरदार मागणी केली आहे.

राष्ट्रीय महामार्गावर हे दुभाजक बनविताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले. त्यामुळे अनेक ठिकाणी हे दुभाजक तुटलेले व विस्कळीत अवस्थेत असून रहदारीला अडथळा होत आहे. वाहनचालकांना या अडथळ्यांमुळे अचानक ब्रेक लावावे लागत असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. काही घटनांमध्ये दुचाकीस्वार या तुटक्या दुभाजकांवर आपटून जखमी झाले आहेत. काही वर्षांपूर्वी या मार्गाचे राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतर करून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ असे नाव देण्यात आले. परंतु, तिरोडा परिसरातील या रस्त्यावरील काम पूर्णपणे ढिसाळ असल्याचे चित्र आहे. याबाबत नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करण्याचे प्रयत्न केले. परंतु, याबाबत कोणतीही स्पष्ट यंत्रणा उपलब्ध नाही. यामुळे नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि व्यापारी संघटनांनी या विषयाकडे लक्ष वेधून घेतले असून प्रशासनाने तात्काळ योग्य ती पावले उचलावीत अशी मागणी जोर धरत आहे. पावसाळ्यात पाण्यामुळे रस्त्यावरील दोष झाकले जातात व वाहनचालक अचानक अडथळ्याला धडकतात. त्यामुळे जखमी होण्याचे प्रमाण वाढत आहे. याच भागातून विद्यार्थी, वृद्ध नागरिक व महिला देखील मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. दुभाजकाच्या निकृष्ट गुणवत्तेबाबत काही अभियंत्यांनी जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांचा रोष आता उफाळून आला आहे. रस्त्याच्या मध्यभागी ठिकठिकाणी तुटलेले दुभाजक हे धोकादायक झाले आहेत.

## कोरोनाकाळात बंद असलेले पॅसेंजर रेल्वेगाड्या १५ जुलै पासून धावणार पूर्ववत




**गोंदिया :–** दक्षिण पूर्व मध्य रेल्वेद्वारे कोरोना काळापासून बंद करण्यात आलेल्या अनेक पॅसेंजर गाड्या प्रवाशी व जनप्रतिनिधींच्या मागणीवर पूर्ववत सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लोकल ट्रेन पुन्हा सुरु होणार असलयाने कमी अंतरावरील प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. १५ जुलै पासून पॅसेंजर रेल्वे पुन्हा सुरु होणार आहे.

या पॅसेंजर मध्ये ७८८०५ गोंदिया–कटंगी डेमु, ७८८०६ कटंगी–गोंदिया डेमु, ७८८०९ गोंदिया–कटंगी डेमु व ७८८१० कटंगी–गोंदिया डेमु, ७८८१३ तुमसर रोड–बालाघाट डेमु, ७८८१४ बालाघाट–तुमसर रोड डेमु, ६८७२१ रायपुर–डोंगरगड मेमुचा समावेश आहे तर १६ जुलै पासुन पुन्हा सुरु होणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये ६८७२३ डोंगरगढ़–गोंदिया मेमु,७८७७२४ गोंदिया–रायपुर मेमु, ६८७४६ रायपुर–गेवरा रोड मेमु, ६८७४५ गेवरा रोड–रायपुर मेमु, ६८७२९ रायपुर डोगरगड मेमु व ६८७३० डोंगरगड–रायपुर मेमु यांचा समावेश आहे.

## खरीप पणन हंगाम २०२४–२५ मधील प्रोत्साहनपर राशीचे बँक व्हेरिफिकेशन

**गोंदिया :–** शासकीय आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत खरीप पणन हंगाम २०२४–२५ मधील धान खरीप पणन हंगाम २०२४–२५ मध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांना (नोंदणी कृत शेतकऱ्यांनी धान विक्री केली असो किंवा नसो) धान उत्पादनाकरीता त्यांच्या धान लागवडीखालील जमीन धारणेनुसार प्रती हेक्टरी रु. २०,०००/– या प्रमाणात (दोन हेक्टरच्या मर्यादेत) प्रोत्साहनपर राशी अदा करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार प्रोत्साहनपर राशीकरीता पात्र शेतकऱ्यांची यादी शासनाच्या इएअच पोर्टलवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. सदर यादीतील शेतकऱ्यांचे बँक व्हेरीफिकेशन करण्याकरीता धान खरेदीदार उपअभिकर्ता संस्थांना या कार्यालयाकडुन प्राप्त शेतकऱ्यांची यादी बँक व्हेरीफिकेशन करण्यासाठी पाठविण्यात आलेली आहे.

गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांना कळिवण्यात येते की, बोनस व्हेरिफिकेशनसाठी केंद्रावर बोलाविणे झाल्यास एक रुपयाही देऊ नये. संस्थांनी शेतकऱ्यांचे बँक खाते आयएफएससी कोड, नाव बरोबर असल्याची, पिकपेरा ७/१२ वर असल्याची खात्री करुन व्हेरिफिकेशन करावयाच्या सुचना यापुर्वीच संस्थांना दिलेल्या आहे. या सर्व बाबी संस्थांनी मोफत करावयाचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी कोणत्याही संस्थाचालकास व्हेरिफिकेशन साठी आर्थीक व्यवहार करु नये. असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी, गोंदिया यांच्याकडुन करण्यात येत आहे. तसेच कोणी पैशाची मागणी करीत असल्यास त्वरीत जिल्हा पणन कार्यालयाशी संपर्क करण्यात यावा.

# १२ पराक्रम स्थळे युनेस्कोच्या व्यासपीठावर

महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गड–किल्लयांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्लयांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारसा स्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोबतच सामान्य जनतेने देखील गड–किल्लयांवर जाऊन आपला आनंद व्यक्त केला. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक असतेच. या शिवाय इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळते. भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पूर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासाता येते. त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग आपले कायम प्रेरणास्त्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात निर्माण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे ठरते. सोबतच अल्प आयुष्यात सुद्धा जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर तुम्ही भीम पराक्रम जगापुढे ठेवू शकता. हजारो वर्ष येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करू शकता असा वस्तूपाठ छत्रपती शिवरायांच्या या १२ किल्लयांनी महाराष्ट्राला, देशाला दिला होता. आता हा दूरदृष्टीचा वारसा यानिमित्ताने जागतिक झाला आहे.

**युनेस्को ; कार्य आणि भूमिका**

युनेस्को (United Nations Educational, Scientific and Cultural Organization) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस (फ्रान्स) येथे झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. युनेस्कोचा उद्देश म्हणजे जगातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे, जपणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे. यासाठी “World H$eritage Convention, 1972” तयार करण्यात आले.

भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात जवळपास ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत (२७ सांस्कृतिक, ७ नैसर्गिक, १ मिश्र स्वरूपाची व इतर प्रस्तावित). यामध्ये राजस्थानच्या गडकिल्लयांचाही सहभाग होता. महाराष्ट्राचे गड किल्ले मात्र दुर्लक्षित होते. यानिमित्ताने त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भारतातील स्थळांची शिफारस



केंद्र सरकार अंतर्गत भारतीय पुरातत्व विभाग करतो. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते.

**पराक्रमाच्या १२ यशोगाथा**

महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्लयांना युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी नामनिर्देशन देण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जिवंत प्रतीक आहेत. स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला रायगड, शिवाजी महाराजांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफ्झलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, भक्कम डोंगररांगेवर वसलेला आणि लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला किल्ला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला दुर्ग सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग आणि मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षणकवच असलेला खांदेरी किल्ला. तर तामिळनाडू राज्यातील दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्लयाचा यात समावेश आहे.

**तत्कालिन युद्धनीतीचे शिलालेख**

महाराष्ट्रातील हे बारा किल्ले आपल्या शेकडो युद्धनीतीच्या प्रात्यक्षिकांसह उभे आहेत.हे वास्तुकलेचे प्रत्यक्ष दर्शन असले तरी जगाला आपल्या दगडांच्या कवितेतून तत्कालीन युद्धनीतीला सांगणारे उत्तम प्रतीचे जणू शिलालेख ही आहे.थोडक्यात, प्रत्येक किल्लयाकडे आपली एक गाथा आहे. जगाला नवल वाटेल अशी रोचक प्रत्येकाची कथा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे किल्ले राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अनमोल आहेत. प्रत्येक किल्लयाचे वैशिष्ट्य स्वयंपूर्ण असून जागतिक पर्यटकांना देखील तत्कालीन युद्धनीतीची माहिती देणारे आहे. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावर ही किल्ले बांधण्यात आली, ज्यामुळे शत्रुपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले. मराठा स्थापत्यकलेतील माची एक वैशिष्ट्य – किल्लयाच्या टोकाला किंवा बाहेरील भागात असलेले बुरुजयुक्त संरक्षण. अशा माच्या जगातील इतर कुठल्याही किल्लयांमध्ये दिसत नाहीत.

शत्रूला सहज लक्षात न येणारे वळणदार, सुरक्षित दरवाजे ही एक विलक्षण प्रवेशद्वारांची रचना आहे. गनिमी कावा अर्थात गुरीला युद्ध नीती मध्ये अशी रचना किती आवश्यक असते याचेही महत्त्व या रचनेवरून कळते. हे किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रेही होती. युनेस्को अद्वितीय वैश्विक मूल्य या निकषावर आधारित स्थळांची निवड करते.

यामध्ये ऐतिहासिक महत्त्व आणि वैभवशाली परंपरा, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, जगात अन्यत्र न आढळणारा अद्वितीय स्वरूप, मानवतेच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाशी असलेली नाळ, संरक्षणाची अवस्था आणि व्यवस्थापन हे पाच गुणधर्म पाहिले जातात. या निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात, म्हणूनच यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यासाठी युनेस्कोच्या यादीत समावेश झाला आहे.

**शिवरायांचा प्रताप जगव्यापी**

या मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगासमोर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या युद्धनीतीचा जागतिक स्तरावरील युद्धांच्या युद्धनीती सोबत अभ्यास होईल. जगाच्या पटलावर एका महान योद्धाच्या पराक्रमाचे चिंतन, मंथन होईल. हे फक्त महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या सन्मानाचे लक्षण आहे. जागतिक पर्यटक देखील या ठिकाणी आकर्षित होतील, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल. १२ पराक्रम स्थळांचे युनेस्कोच्या व्यासपीठावर आगमन होणे ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे. हे फक्त वास्तुकलांचे प्रतिनिधी नसून, स्वातंत्र्याची, धैर्याची आणि एकीची अमूल्य प्रतीके आहेत. यामुळे शिवरायांचे विचार, त्यांचे शौर्य आणि त्यांची दूरदृष्टी नव्या पिढीपर्यंत पोहचेल, आणि जगातील इतिहासात भारताचे स्वाभिमानी पान अधिक उजळून निघेल.

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर
९७०२८५८७७७

साप्ताहिक
बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com


# 'सर्किट ब्रेकर'च्या माध्यमातून वीज अपघात टाळा

**नागपूर:-** पावसाळ्याच्या दिवसांत विजेच्या तारा, भिंती किंवा उपकरणांतून वीजप्रवाह उतरून अपघात होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असते. अशा गंभीर विद्युत अपघातांपासून स्वतःचा आणि कुटुंबाचा जीव वाचवण्यासाठी घर, दुकान किंवा इतर आस्थापनांमध्ये सर्किट ब्रेकरचे सुरक्षा कवच बसवून घ्यावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

घरगुती वायरिंगमध्ये बिघाड, करंट लिकेज किंवा योग्य क्षमतेचे मसर्किट ब्रेकरफ आणि मअर्थिंगफ नसणे हीच या अपघातांची मुख्य कारणे असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. त्यामुळे वीज सुरक्षेला प्राधान्य देत प्रत्येक नागरिकाने खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे.

**सर्किट ब्रेकर म्हणजे काय?**

सर्किट ब्रेकर हे आपल्या घरातील किंवा व्यावसायिक ठिकाणातील विद्युत यंत्रणेसाठी एक अत्यंत महत्त्वाचे सुरक्षा कवच आहे. विजेच्या संभाव्य अपघातांपासून संरक्षण मिळवण्यासाठी आणि उपकरणे सुरक्षित ठेवण्यासाठी याचा वापर करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

एखाद्या सर्किटवर क्षमतेपेक्षा जास्त विद्युत भार (उदा. एकाच सॉकेटमध्ये अनेक उपकरणे लावणे) येतो, तेव्हा तारा गरम होतात आणि आग लागण्याचा धोका असतो. सर्किट ब्रेकर तात्काळ हा अतिरिक्त भार ओळखतो आणि वीजपुरवठा खंडित करतो, ज्यामुळे शॉर्ट सर्किट आणि आगीचा धोका टळतो. वायरिंगमध्ये बिघाड झाल्यास किंवा दोन विद्युत तारा एकमेकांना चिकटल्यास मशॉर्ट सर्किटफ होते. यामुळे अचानक प्रचंड विद्युत प्रवाह निर्माण होतो, ज्यामुळे उपकरणे जळू शकतात किंवा आग लागू शकते. सर्किट ब्रेकर हे धोकादायक शॉर्ट सर्किट होताच वीजप्रवाह बंद करतो. विशेषतः 'अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर' (ELCB) किंवा मरेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकरफ (RCCB) हे मानवी जीवाला विद्युत धक्क्यापासून वाचवण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. जर एखाद्या व्यक्तीला विजेचा धक्का लागला किंवा विद्युत प्रवाहाची गळती (लीकेज) झाली, तर हे ब्रेकर काही मिलीसेकंदात वीजपुरवठा बंद करतात, ज्यामुळे गंभीर दुखापत किंवा मृत्यूचा धोका टळतो. फ्रिज, टीव्ही, वॉशिंग मशीन, पंखे यांसारख्या महागड्या विद्युत उपकरणांना ओव्हरलोड किंवा शॉर्ट सर्किटमुळे होणाऱ्या नुकसानीपासून वाचवण्यासाठी सर्किट ब्रेकर अत्यंत प्रभावी ठरतो. वीज अचानक बंद झाल्याने उपकरणांना नुकसान होत नाही. घरातील एखाद्या विशिष्ट भागातील वायरिंगमध्ये काम करायचे असल्यास, त्या भागातील सर्किट ब्रेकर बंद करून सुरक्षितपणे काम करता येते, ज्यामुळे संपूर्ण घराची वीज बंद करण्याची गरज लागत नाही. त्यामुळे, मिनिएचर सर्किट ब्रेकर (MCB), अर्थ लीकेज सर्किट ब्रेकर (ELCB) किंवा रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर (RCCB) यांसारखे योग्य क्षमतेचे सर्किट ब्रेकर घरात बसवण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.



केवळ सर्किट ब्रेकरच नव्हे, तर वीज सुरक्षा व्यवस्थेमध्ये 'अर्थिंग' हे तितकेच महत्त्वाचे आहे. घरात किंवा उपकरणांमध्ये अतिरिक्त वीजप्रवाह निर्माण झाल्यास, तो सुरक्षितपणे जमिनीखालील "अर्थिंग'द्वारे वाहून जातो. यामुळे विजेचा धक्का बसण्याचा धोका टळतो. नवीन वास्तू बांधताना अर्थिंगसह सर्किट ब्रेकर बसवणे अनिवार्य आहे. मात्र, जुन्या इमारतींमध्ये किंवा घरात ते बसवलेले नसल्यास, ते तातडीने बसवून घेणे आवश्यक आहे. तसेच, प्रत्येक दोन वर्षांनी आपल्या घरातील अर्थिंग योग्य स्थितीत आहे की नाही, याची खात्री करून घ्यावी, असेही महावितरणने सांगितले आहे.


याचसोबत बाजारात केवळ २० ते ५० रुपयांत उपलब्ध असलेल्या विद्युत टेस्टरचा उपयोग करून भिंती, पत्रे, कपडे वाळत घालण्याची लोखंडी तार, फ्रीज, कुलर, गिझर किंवा नळ यांसारख्या वस्तूंना स्पर्श करण्यापूर्वी तपासणी करा. जर टेस्टरमधील दिवा लागला, तर याचा अर्थ त्या वस्तूमध्ये वीजप्रवाह उतरला आहे आणि तिला स्पर्श करणे धोकादायक आहे. घरात किंवा घराबाहेरील ओल्या ठिकाणी विजेच्या उपकरणांशी काम करताना पायात रबरी किंवा प्लास्टिकची चप्पल अवश्य वापरा. ओलसर लोखंडी पाईप, कृषिपंपाची पेटी किंवा पाण्याच्या मोटारपंपांना हात लावण्यापूर्वी त्याची तपासणी करण्याच्या सुचना देखील नागरिकांना करण्यात आल्या आहेत.

वीज सुरक्षा ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नसून, ते एक सामाजिक दायित्व आहे, प्रत्येक नागरिकाने विजेचा वापर करताना योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. सर्किट ब्रेकर आणि योग्य अर्थिंगची तपासणी करून आपण केवळ स्वतःचा जीवच वाचवत नाही, तर कुटुंबातील सदस्यांना आणि परिसरातील इतरांनाही संभाव्य अपघातांपासून सुरक्षित ठेवतो. ही सामूहिक जबाबदारी आहे, जी सर्वांनी मिळून पार पाडल्यास विद्युत अपघातांवर निश्चितपणे नियंत्रण मिळवता येईल, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे केली कामगार नोंदणी, गुन्हे दाखल करणार

## चार तालुक्यांत प्रकार उघडकीस : गडचिरोलीच्या पथकाने सुरू केली चौकशी

**गोंदिया :-** शासनाकडून कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा लाभ मिळवून देण्याकरिता काही दलालदेखील जिल्ह्यात सक्रिय झाले आहेत. बनावट कागदपत्रांच्या आधारे देवरी, आमगाव, गोरेगाव आणि तिरोडा या तालुक्यांत बऱ्याच प्रमाणात कामगार नोंदणी केल्याचा प्रकार तक्रारीनंतर उघडकीस आला आहे. याची दखल घेऊन कामगार विभागाने याची गडचिरोली जिल्ह्यातील तीन अधिकाऱ्यांच्या पथकांमाफत चौकशी सुरू केली आहे.



महाराष्ट्र सरकारच्या इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडून बांधकाम कामगारांच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभदेण्यासाठी नोंदणी सुरू केली आहे. कामगार कल्याण मंडळाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वे आणि शर्तींच्या अधीन राहून, ९० किंवा त्याहून अधिक दिवस काम करणाऱ्या कामगारांची ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर, कामगारांना बांधकामाशी संबंधित सुरक्षा उपकरणे आणि घरगुती वस्तू, अपघात झाल्यास मोफत उपचार, विमा, त्यांच्या मुलांना शिक्षण आणि इतर सुविधांमध्ये कामगार विभागाकडून आर्थिक मदत देण्याची तरतूद आहे. बांधकाम कामगार नोंदणीसाठी, नोंदणीची संपूर्ण प्रक्रिया मकामगार कल्याण मंडळफच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे. मात्र, काही दलालांनी पैसे घेऊन कामगारांची बनावट कागदपत्रे व प्रमाणपत्रे जोडून नोंदणी करून दिल्याचे पुढे आले.

यासंबंधीच्या तक्रारी आमगाव, गोरेगाव, देवरी आणि तिरोडा या चार तालुक्यांतून कामगार विभागाला प्राप्त झाल्या. या तक्रारींच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी गडचिरोली येथील कामगार कल्याण कार्यालयातील तीन अधिकाऱ्यांची चौकशी समिती तयार करण्यात आली. या समितीने या चारही तालुक्यांतील कामगारांना नोंदणीसाठी जोडलेले प्रमाणपत्र आणि कागदपत्रांची पडताळणी करणे सुरू केले आहे. पडताळणीत आमगाव आणि देवरी तालुक्यांतील काही कामगारांनी बनावट प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे जोडल्याचे पुढे आले आहे. पडताळणीचे काम आणखी दहा दिवस चालणार असून त्यानंतर नेमक्या किती कामगारांनी बोगस प्रमाणपत्रे जोडली आहेत हे सांगता येईल, असे चौकशी समितीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पोलिस मुख्यालय परिसरात केले वृक्षारोपण



**गोंदिया :-** पोलिस विभागातील बॉम्ब शोधक व नाशक पथक, श्वान पथक, मोटर परिवहन विभाग आणि हिरवळ बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने लगतच्या ग्राम कारंजा येथील पोलिस मुख्यालय परिसरात रविवारी (दि. १३) वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी वड, पिंपळ, कडुलिंब, जांभूळ, आंबा, चिकू, फणस, गुलमोहर आदी प्रजातीच्या देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. पोलिस अधीक्षक गोरख भामरे, पोलिस उपअधीक्षक (गृह) शेवते, पोलिस निरीक्षक प्रवीण मुंडे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाला रापोनि राजेश सरोदे, श्वान पथक प्रभारी पोलिस उपनिरीक्षक सतीश सिरिया, मोटर परिवहन विभागातील पर्यवेक्षक चंद्रशेखर कटरे यांच्यासह विविध विभागांतील पोलिस अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी झाडे लावून, त्यांना पाणी देऊन आणि त्यांची निगा राखण्याची शपथ घेतली. कार्यक्रमासाठी हिरवळ बहुउद्देशीय संस्थेचे दीपक परमार, प्रताप आसवानी, हेमंत पटेल, पीनल पटेल, राहुल राठौड, मनोज निर्मल, मंगेश तिडके, सुमित गुप्ता, सुप्रीत बैस, सौरभ गौतम, छत्रपाल शहारे आदींनी सहकार्य केले.

# गोरेगाव येथील दुय्यम निबंधक कार्यालयात सुविधा,व्यवस्थेचा अभाव

**गोरेगाव:-** येथील दुय्यम निबंधक कार्यालय नेहमीच सोयी-सुविधांबाबत चर्चेत असते. मात्र, आता कार्यालयाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहेत. येथे कार्यरत निबंधक अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात न राहता दररोज अप-डाऊन करतात. यामुळे रजिस्ट्रीच्या कामांना विलंब होत आहे. तसेच कार्यालयातील यंत्रणा व सुविधा गायब आहेत. त्यामुळे कार्यालयात येणाऱ्यांची कुचंबना होत आहे. या कार्यालयातील व्यवस्था सुरळीत करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.





गोरेगाव तालुका मुख्यालयी असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयात दरवर्षी सुमारे १५०० ते २००० रजिस्ट्री होतात. मात्र, कार्यालयात २०१९ पासून प्रिंटर उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत नागरिकांना रजिस्ट्री सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव येथून करावी लागत असून एका कागदपत्रासाठी खूप वेळ लागते. येथे दररोज ८ ते १० रजिस्ट्री होतात. एका रजिस्ट्रीची नोंद करण्यासाठी अनेक लोक उपस्थित असतात. मात्र या लोकांना कार्यालयात बसण्याची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही. पिण्याच्या पाण्यापासून ते स्वच्छतागृहापर्यंतचा प्रश्न कार्यालयात कायम आहे.

विशेष म्हणजे, जिल्ह्यातील बहुतांश दुय्यम निबंधक कार्यालये ही तहसील कार्यालयाला लागून आहेत. मात्र, गोरेगावचे दुय्यम निबंधक कार्यालय तहसील कार्यालयापासून दूर आहे. ज्यामध्ये स्टॅम्प पेपर तयार करण्यासाठी लोकांना त्रास सहन करावा लागतो. या

कार्यालयात एका नोंदणी अधिकाऱ्यासोबत दोन जण कंत्राटवर काम करीत आहेत. मात्र, अधिकाऱ्यांच्या अप-डाऊनचा परिणाम कामांवर होत आहे. येथे मागील दोन दिवसांपासून सर्व्हर डाऊन असल्याने अनेक नागरिकांची रजिस्ट्री अडकली आहे. मात्र, रजिस्ट्री अधिकाऱ्यांच्या दररोजच्या अप-डाऊनमुळे ही समस्या कायम आहे.

विशेष म्हणजे, जमीन, प्लाट, घर यांची रजिस्ट्री त्यांच्या क्षेत्रफळानुसार केली जाते. ज्यात प्रशासनाने नियमित शुल्क निश्चित केले असून इतर कोणतेही शुल्क आकारले जात नाही. परंतु, येथे परिस्थिती उलट असून याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. यासर्व प्रकाराकडे प्रशासनाने लक्ष देऊन दुय्यम निबंधक कार्यालया सुविधा पुरविण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# कार्यालय ग्रामपंचायत कवलेवाडा

## पंचायत समिती गोरेगाव,जिल्हा परिषद-गोंदिया

## निविदा सुचना(पहिली वेळ)

ग्रामपंचायत कार्यालय कवलेवाडा पं.स. गोरेगाव, जिल्हा परिषद गोंदिया येथे अंतर्गत १५ वा वित्त आयोग अतर्गत कामे(सन २०२२-२३ व २०२३-२४) अंतर्गत खालील विवरण पत्रामधील पूर्ण बांधकामाची निविदा महाराष्ट्र शासन तरतुदीच्या अधीन राहून यथायोग्य पंजीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पध्दतीने कामे करण्याकरीता मोहरबंद दोन लिफाफा पध्दतीने अनुसूची ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किमंत | निविदा व फार्मची किमंत | निविदेसोबत भरावयाची अनामत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बह्याबाबा मंदिर येथे पाण्याची व्यवस्था करणे | १०००००/- | ५००/- | १०००/- | ६ महिने | योग्य त्या वर्गवारीत नोंदणीकृत |
| २. | इसाटोला अंगणवाडी येथे पाण्याची व्यवस्था करणे | ८८०००/- | | ८८०/- | ६ महिने | |
| ३. | सिमेंट रोड दुरुस्ती,बांधकाम करणे | १५५३३०/- | | १५५०/- | ६ महिने | |
| ४. | सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे | १४१९९६/- | | १४२०/- | ६ महिने | |
| ५. | डोंगरुटोला शाळा रंगरंगोटी करणे | ८००००/- | | ८००/- | ६ महिने | |
| ६. | सार्वजनिक विहिर दुरुस्ती करणे | ९१०००/- | | ९१०/- | ६ महिने | |
| ७. | सार्वजनिक विहिर दुरुस्ती करणे | १०००००/- | | १०००/- | ६ महिने | |

**वरील कामाची निविदा प्रकाशित दिनांकः** - १४/०७/२०२५
**निविदा विक्री व स्विकृतीचा अंतिम दिनांक** :- १६/०७/२०२५ सकाळी १० ते २३/०७/२०२५ सांय.०४.वाजेपर्यंत
**निविदा उघडण्याचा दिनांक** - २४/०७/२०२५ दुपारी ०१.००वाजे(शक्य झाल्यास)

सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत कार्यालय येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली आहे.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय कवलेवाडा

सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय कवलेवाडा


## वृध्दाश्रम सुरू करणेसाठी इच्छुक स्वयंसेवी संस्थाकडून प्रस्ताव आमंत्रीत

**गोंदिया :-** सहायक आयुक्त समाजकल्याण विभागामार्फत अटल वयो अभ्युदय योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी एकात्मिक कार्यक्रम योजनेमधून वृध्दाश्रम चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्यात येते. या अंतर्गत वृध्दाश्रमातील निवारा, पोषक अन्न, वैद्यकीय सुविधा आणि मनोरंजनात्मक सुविधा मोफत देण्यात येतात. तसेच जिल्ह्यांमध्ये काम करणाऱ्या चांगल्या स्वयंसेवी संस्था किंवा एच्छिक संघटना निवडून वृध्दाश्रम चालवण्यासाठी ई-अनुदानाचा अर्ज करण्यास प्रोत्साहित करणेबाबतच्या सूचना शासनस्तरावरून प्राप्त झालेल्या आहे. कमी क्षमतेचे वृध्दाश्रम असल्यास ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नाबाबत कार्य करणारी स्वयंसेवी/ अशासकीय संस्थांमध्ये केंद्र शासनाच्या अटल वयो अभ्युदय योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी एकात्मिक कार्यक्रम राबवित आहे.

# आय एम विनर स्पर्धेतून घडतील उद्याचे अधिकारी : लायकराम भेंडारकर

**गोंदिया :-** आजचे युग स्पर्धेचे असून, या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून आजच्या पिढीला आपली स्वप्न साकार करता येतील. आय. एम. विनरसारख्या स्पर्धा परीक्षांतूनच उद्याचे अधिकारी घडणार असून, महाराष्ट्रासह गोंदिया जिल्ह्याचा नावलौकिक नक्कीच वाढेल, असे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांनी केले.

ध्येय एज्युकेशन फाउंडेशन माफत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे आयोजित आय. एम. विनर राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा-२०२५ ध्येयतरंगच्या अंतर्गत बक्षीस वितरण समारंभ व कर्तव्यदक्ष अधिकारी कर्मचारी सोहळ्यात सन्मान कर्तव्यदक्ष अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार



सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

प्रमुख पाहुणे म्हणून डायट प्राचार्य राजकुमार हिवारे, माजी प्राचार्य डॉ. नरेश वैद्य, शिक्षणाधिकारी सुधीर महामुनी, गटशिक्षणाधिकारी प्रदीप समरीत, जिल्हाप्रमुख वशिष्ठ खोब्रागडे उपस्थित होते. खोब्रागडे यांनी या स्पर्धा परीक्षेबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. महामुनी यांनी, ही परीक्षा यूपीएससी एमपीएससीचा परिचय करून देणारी राज्यस्तरीय संधी आहे, असे सांगितले. हिवारे यांनी, अशा उपक्रमांचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांनी या स्पर्धेतून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. संचालन नरेंद्र गौतम यांनी केले. आभार सुनील ठाकूर यांनी मानले.

# अल्पवयीन वाहनचालकांना ७० हजार रुपयांचा दंड वसूल



## कायदा काय म्हणतो?

**मोटार वाहन सदर (सुधारणा) अधिनियम २०१९ कलम १९९ (ए) अन्वये अल्पवयीन व्यक्तीने वाहतूक कायद्याचे उल्लंघन केल्यास त्याच्या पालकांना जबाबदार धरण्यात येते.कलमानुसार अल्पवयीन बालकाकडून मोटार वाहन अधिनियमातील तरतुदीनुसार गुन्हा घडल्यास अशा वाहनाच्या मालकास तीन वर्षापर्यंत कारावास किंवा २५ हजार रुपये दंड किंवा दोन्हीही अशा कडक शिक्षेची तरतूद आहे. तसेच अशा अल्पवयीन बालकावर बाल न्याय अधिनियम २०१५ नुसार बाल न्याय मंडळासमोर खटलासुद्धा चालविला जाऊ शकतो.**

**मोहिमेचा उद्देश शहरातील अपघातांचे प्रमाण कमी करणे, हा आहे. अल्पवयीन वाहनचालकांच्या पालकांनीदेखील जबाबदारीने वागून आपल्या मुलांना रस्ते वाहतूक विषयीच्या सर्व नियमांची माहिती करून द्यावी. अन्यथा आता ही मोहीम पुन्हा तीव्र करून थेट गुन्हे दाखल करून दंडदेखील आकारण्यात येईल. त्यात शिक्षेचीदेखील तरतूद आहे.**

**-नागेश भास्कर, निरीक्षक, जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखा**

**गोंदिया:-** जिल्हा आणि शहरातील वाढत्या वाहतुकीच्या वर्दळीमुळे गेल्या काही काळात शहरातील अपघातांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. तसेच शहरात अल्पवयीन मुलेदेखील विनापरवाना दुचाकी चालवित असल्याचे दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांनी शहरातील वाहतूक शिस्तबद्ध पद्धतीने होऊन अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी बेजबाबदार वाहनचालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने वाहतूक शाखेने १४ अल्पवयीन वाहनचालकांना पकडून समज देत त्यांच्या पालकांकडून ७० हजार रुपयांचा दंड वसूल केला.

जिल्हा वाहतूक शाखेमार्फत विविध ठिकाणी नाकाबंदी मोहीम राबविण्यात येऊन वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

जानेवारी ते जून महिन्यापर्यंत करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान काही अल्पवयीन मुले वाहन चालविताना मिळून आले. या सर्वांकडे कुठल्याही प्रकारचा वाहन परवाना नसताना देखील त्यांच्या पालकांनी आपल्या अल्पवयीन मुलांना दुचाकी वाहन वापरण्यासाठी दिल्याने मोटार वाहन (सुधारणा) अधिनियम २०१९ कलम १९९ (ए) अन्वये १४ पालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, वाहने जप्त करण्यात आली आहेत. मात्र, ज्या बालकांना पकडण्यात आले ते ट्युशनकरिता जात होता. यात वाहन चालविणारे अल्पवयीन असल्याने हा त्यांचा गुन्हा होता.



# निविदा-सुचना

## महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

Main Portal:http://wrd.maharastra.gov.in

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा दुरध्वनी क्रमांक (०७१८४) २५०८९५, :Email:eechelidb@rediffmail.com हे महाराष्ट्रात नोंदणीकृत असलेल्या परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे कामाच्या ब-१ नमुन्यात त्यांची निविदा निश्चित करण्यासाठी प्रस्ताव मागवित आहेत.
निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. दस्तावेज कार्यकारी अथियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा, यांच्या कार्यालयात दि. १६/०७/२०२५ पासून दि.२३/०७/२०२५ पर्यंत उपलब्ध होवू शकतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित रक्कम रू | इसारा | निविदा उपलब्ध रक्कम रू | निविदा स्विकृती व कालावधीउघडणे | प्रत्येक निविदा संचाची किंगत रू.(नापरतावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजेगावकाटी उपसा सिंचन योजना ता.जि.गोंदिया येथील कळयंत्र आवारातील ३३/६.६ केव्ह रोहत्रीमध्ये तेल गळती व भरण्याचे काम. (निविदा क्र.काअ/विजविवउसिंविभं/ रजेगावकाटी उसिंयो गळती /१८/२०२५-२६ | ४,६८,९०५/- | ४,७००/- | दि.१६/०७/२०२५ ते दि.२३/०७/२०२५ | निविदा सादर करणे दि.२५/०७/२०२५ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उघडण्यात येईल. | रू.११८०/- (नापरतावा) |
| २. | तेढवा शिवनी उपसा सिंचन योजना ता.जि.गोंदिया येथील कळयंत्र आवारातील ३३.६.६ केव्ही रोहीत्रामध्ये तेल भरण्याचे काम (निविदा क्र.काअ/विजविवउसिंविभं/ तेढवा शिवनी उसिंयो टापींग अप /१९/२०२५-२६) | ६,७१,९२१/- | ६,८००/- | दि.१६/०७/२०२५ ते २३/०७/२०२५ | निविदा सादर करणे दि.२५/०७/२०२५ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उघडण्यात येईल. | रु.११८०/ (नापरतावा) |
| ३. | रजेगावकाटी उपसा सिंचन योजना ता.जि.गोंदिया येथे Street Light, Flood Light & Solar Street चा पुरवठा उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरणाचे काम. (निविदा क्र.काअ/विजविवउसिंविभं/ रजेगावकाटी उसिंयो लाईट/२०/२०२५/२६) | ६,४७,२९०/- | ६,५००/- | दि.१६/०७/२०२५ ते २३/०७/२०२५ | निविदा सादर करणे दि.२५/०७/२०२५ रोजी १२.०० वाजता पर्यंत शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० निविदा उघडण्यात येईल. | रू.११८०/- (नापरतावा) |

१. केंद्र शासन, राज्य शासन किंवा स्थानिक संस्था यांनी आकारलेले सर्व कर, शुल्क (ज़ी.एस.टी. वगळून) यांचा उध्दरत दरामध्ये समावेश असावा.निविदाकारानी जी.एस.टी. वगळून दर उद्धरत करावेत. स्वीकृत निविदा किमतीवर जी.एस.टी. देय राहील. जी.एस.टी.शासनास वेळोवेळी भरण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कंत्राटदाराने जी.एस.टी. कंत्राटदाराने जी.एस.टी. भरणा केलेबबातची सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे, पुरावे पावत्या सादर केल्यानंतर व त्याची आवश्यक खातरजमा या कार्यालयाने केल्यानंतरच त्याची कंत्राटदारास परतफेड करण्यात येईल.
२.निविदा विषयक थोडक्यात दिनांक निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे. सविस्तर निविदा सुचना http://wrd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. टीपः-कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा तसेच निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरींकार यांनी राखून ठेवलेला आहे.

जा.क्र. ७९२/काअ/विजविवउसिंविभं/निली/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा ४४१९०४

प्रत-सुचना फलक, कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा
जिमाका/गों/जाहि/२६/२०२५

**(ठा.अ.गायधने)**
कार्यकारी अभियंता
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा

# सीसीएमपी उत्तीर्ण होमिओपॅथीक डॉक्टरांची नोंदणी सुरु न केल्यास १६ जुलैपासून आंदोलन



**गोंदिया:–:** राज्य सरकारने होमिओपॅथी डॉक्टरांना औषधशास्त्र या विषयाचा एक वर्षाचा ब्रिज कोर्स (सीसीएमपी) पूर्ण केल्यानंतर ङ्गआधुनिक वैद्यकीय व्यवसायीफ म्हणून मान्यता देऊन त्यांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमध्ये नोंदणी करण्याचा घेतलेला निर्णयाचा इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) विरोध करीत आहे.यावर होमिओपॅथी संघटनेने तीव्र आक्षेप घेतला असून,आयएमएची भूमिका अन्यायकारक आणि सर्वसामान्यांसाठी धोकादायक असल्याचा दावा केला आहे.सरकारने आयएमएच्या दबावात निर्णय घेतल्यास राज्यव्यापी आंदोलन पुकारण्याचा इशाराही होमिओपॅथीक इंटीग्रेटेड मेडीकल प्राक्टिशनर्स असो.गोंदियाच्यावतीने देण्यात आल्याची माहिती संघटनेचे गोंदिया जिल्हाध्यक्ष डॉ.संजय देशमुख,सचिव डॉ.डी.एम.सुरासावत,डॉ.सचिन चौधरी,डॉ.साजिद खान यांनी पत्रपरिषदेतून दिली आहे.

**निर्णयामागील पार्श्वभूमी आणि शासनाची भूमिका**

केंद्र सरकारने यापूर्वी आयुर्वेद अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांना ॲलोपॅथीचा सराव करण्यास मान्यता दिली होती. याच धर्तीवर, आता महाराष्ट्र राज्य सरकारने होमिओपॅथी डॉक्टरांना एक वर्षाचा सीसीएमपी (Certificate Course in Modern Pharmacolog) हा ब्रिज कोर्स पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी करण्यास मान्यता दिली आहे. या निर्णयामागे, ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक बळकट करणे आणि डॉक्टरांची उपलब्धता वाढवणे हा उद्देश असल्याचे सरकारकडून सूचित केले जात आहे. १५ जुलै २०२५ पासून हा आदेश लागू करण्याचा निर्णय शासनाने कायम ठेवला असून नोंदणी करण्याचे आवाहन सीसीएमपी कोर्स केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना करण्यात आले आहे.मात्र या निर्णयाच्याविरोधात एमबीबीएस डॉक्टरांची असलेली संघटना आयएमएने केल्याने पेच निर्माण झालेला आहे.राज्यसरकारने १५ जुलैपासून नोंदणी सुरु न केल्यास १६ जुलैपासून मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत आंदोलनास सुरवात करण्यात येणार असल्याची माहिती पत्रपरिषदेत डॉ.देशमुख यांनी दिली.

फेब्रुवारी महिन्यातच आयएमएने राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून न्यायालयाने यावर कुठलीही भूमिका स्पष्ट केलेली नाही.तर ९ जुलै २०१५ मध्ये मा.न्यायाधिश ए.के.सिक्री व न्या.रोहिंटन फाली नरिमन यांनी आयएमए पुणे शाखेने दाखल केलेली याचिका सुध्दा फेटाळून लावली आहे.त्यामुळे न्यायालयाचा अवमान होत आहे,असे सांगून सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न आयएमए करीत असून प्रसारमाध्यमातून खोट्या व चुकीच्या माहिती देत होमिओपॅथीक डॉक्टरांचा अवमान करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**सीसीएमपी कोर्स**

सीसीएमपी कोर्स हा एक वर्षाचा ब्रिज कोर्स आहे. होमिओपॅथिक डॉक्टरांना ॲलोपॅथीचे मर्यादित प्रमाणात मूलभूत ज्ञान मिळावे यासाठी तो तयार करण्यात आला आहे.तो अभ्यासक्रम सुध्दा आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत येत असलेल्या एमबीबीएस डॉक्टरांनीच केले असून वैद्यकीय महाविद्यालयात ब्रिज कोर्सचा अभ्यासक्रम पुर्ण करुन घेतलेल्या परिक्षेत उत्तीर्णही होमिओपॅथीचे डॉक्टर झालेले आहेत.

८ जुलै २०१४ रोजी प्रकाशित महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रात या अभ्यासक्रमाला मंजुरी देण्यात आलेली आहे.गेल्या ८ वर्षापासून सदर अभ्यासक्रम सुरु असून राज्यात ९१६० होमिओपॅथिक वैद्यकिय व्यवसायिकांनी हा अभ्यासक्रम यशस्विरित्या पुर्ण केलेला आहे.विशेष म्हणजे आजही अनेक रुग्णालयात आरएमओची जबाबदारी सांभाळणारे आमच्यासारखेच डॉक्टर असतात असेही ते म्हणाले.तर कोरोना काळात ग्रामीण भागात होमिओपॅथिक डॉक्टरांनीच सेवा केल्याचेही डॉ.साजिद खान म्हणाले.

विशेषतः आपत्कालीन परिस्थितीमध्ये, जिथे त्वरित आणि अचूक निदानाची तसेच उपचारांची आवश्यकता असते, तिथे केवळ मर्यादित ज्ञान असलेल्या डॉक्टरांकडून रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो,असा चुकिचा भ्रम आयएमए निर्माण करीत असल्याचेही ते म्हणाले.या पत्रपरिषदेला डॉ.भुवन लांजेवार,डॉ.मोहित गौतम,डॉ.मृणाल पटले,डॉ.महेश नाकाडे,डॉ.विवेक मेंढे,डॉ.अजय उमाटे,डॉ.टी.डी.कटरे,डॉ.अनिल चौरागडे,डॉ.सुरेंद्र रहांगडाले,डॉ.रुपसेन बघेले, डॉ.प्रदिप रोकडे,डॉ.ललीत कलंत्री, डॉ.महेश लोथे,डॉ.हेमराज अरसोडे,डॉ.गजानन चुटे,डॉ.गिरीश पारधी,डॉ.गगन वर्मा,डॉ.विनोद इलमकर,डॉ.अभय बोरकर,डॉ.लक्ष्मीकांत चांदेवार,डॉ.अजय बेलानी,डॉ.रुपेश परशरामकर,डॉ.दिलीप पनपालिया, डॉ.कुशल रॉय यांच्या मोठ्या संख्येने होमिओपॅथी डॉक्टर उपस्थित होते.

# जयस्तंभ चौकातील मॉस मेकअप सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय,दोघांना अटक



**गोंदिया :–**शहरातील अनेक भागात वेश्याव्यवसायाला ऊत आले आहे,काही महिन्यापुर्वी सिव्हील लाईन परिसरातही पोलिसांनी कारवाई केली होती.त्यानंतरही त्या परिसरात हा व्यवसाय सुरु असल्याची चर्चा असतानाच शहर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या जयस्तंभ चौकातील मॉस मेकअप स्टुडिओ एण्ड द बॉडीस स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय होत असल्याचे उघडकीस आले आहे.याठिकाणाहून दोघांना अटक करण्यात आली असून तपासाच्यावेळी अंदाजे ३–४ महिलांना त्या ठिकाणाहून सोडविण्यात पोलिसांना यश आले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलीस अधिक्षक गोरख भामरे आणि पोलीस निरिक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनात जयस्तंभ चौकातील मॉस मेकअप स्टुडिओ एन्ड द बोंडीस स्पा सेंटर येथे गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमंलदार तसेच बेटा बचाव राष्ट्रीय अभियान व नशा हटाव संस्थेचे गोंदिया जिल्हाध्यक्ष यांचे सह मास मेकअप स्टुडिओ द एन्ड बांडीज स्पा सेंटरच्या आजुबाजूस सापळा रचून सदर ठिकाणी धाड टाकण्यात आले असता त्या ठिकाणी रुम मध्ये बेडवर ग्राहक सोबत एक महिला आढळून आली. त्या महिलेस विचारपुस केले असता, मास मेकअप स्टुडिओ द एन्ड बॉडीज स्पा सेंटर मालक बळीराम बस्ताराम घोटेकर आणि त्याचा भाऊ दिलीप बस्ताराम घोटेकर हे स्पा सेंटर मध्ये वेश्याव्यवसाय करायला लावतात असे सांगितले. त्यावरुन अधिकची स्पा सेंटरची पाहणी करण्यात आली असता पहिल्या मजल्यावर ४ महिला मिळाल्या.त्यांनी सुद्धा स्पा सेंटरचे मालक या ठिकाणी वेश्याव्यवसाय करायला लावतात असे सांगितले.त्यावरुन मास मेकअप स्टुडिओ एन्ड द बॉडीज स्पा सेंटरचे मालक बळिराम बस्ताराम घोटेकर, वय ३५, व दिलीप बस्ताराम घोटेकर, वय ३२,रा. रेलटोली, कस्तुर हॉटेलच्या बाजुला, गोंदिया, ता. जि. गोंदिया यांच्याविरुध्द महिलांना पैशाचे आमिष देवून स्वत च्या आर्थिक फायद्याकरीता वेश्याव्यवसाय करतांना आढळल्याने पो.स्टे. गोंदिया शहर येथे अपराध क्रमांक ५४६/२०२५ कलम ३, ४,५.६ अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कामगीरी सपोनी धिरज राजुरकर, पोउपनि वनिता सायकर, पोहवा राजेंद्र मिश्रा , पोहवा संजय चव्हाण , पोहवा महेश मेहर, पोहवा रियाज शेख, पोहवा प्रकाश गायधने, पोहवा सोमेन्द्रसिंग तुरकर , पो.शि. संतोष केदार, पो.शि. राकेश इंदुरकर, पो.शि. छगन विठ्ठले, मपोशि स्मिता तोंडरे, चापोशि राम खंडारे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यांनी केली आहे.

# तिरोडा व गोंदियातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना रुग्णवाहिकांचे वितरण



**गोंदिया:–** गोंदिया जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला मिळालेल्या चार नवीन रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा नुकताच जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते पार पडला.आरोग्य विभागाच्या सेवेत आलेल्या रुग्णवाहिका तिरोडा तालुक्यांतील मुंडिकोटा, इंदोरा, सुकडी आणि गोंदिया तालुक्यातील खमारी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना वितरित करण्यात आल्या.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती सुरेश हर्षे,अर्थ व बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत,माजी जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले,महिला बालकल्याण सभापती सौ.पौर्णिमाताई ढेंगे,कृषी व पशुसंवर्धन सभापती सौ.दीपाताई चंद्रिकापुरे,समाजकल्याण सभापती सौ.रजनीताई कुंभरे,मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगांनथम,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गोल्हर तसेच जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

ग्रामीण आरोग्य सेवा अधिक प्रभावी आणि वेगवान होण्यासाठी या रुग्णवाहिका उपयुक्त ठरणार असा विश्वास यावेळी जि.प.अध्यक्ष भेंडारकर यांनी व्यक्त केला.या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपचारासाठी दवाखान्यात पोहचवणे सुलभ होणार असून, आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होणार असल्याचे आरोग्य सभापती सुरेश हर्षे यांनी म्हटले.याप्रसंगी आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

# भेगांमुळे सिंगाडा तलावाचे अस्तित्व धोक्यात



**तिरोडा: –** शहराची जीवनरेखा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंगाडा तलावाच्या धरणाला (पारा) मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत, ज्यामुळे आजूबाजूच्या परिसराला धोका निर्माण झाला आहे. ही बाब गांभीर्याने घेत उपविभागीय अधिकारी श्रीमती पूजा गायकवाड यांनी तात्काळ बैठक घेऊन घटनास्थळाची पाहणी केली आणि लघु पाटबंधारे विभागाला लवकरच दुरुस्ती करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

१० जुलै रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयात झालेल्या विशेष बैठकीत तलावाची सद्यस्थिती, गळती, मातीची धूप आणि तांत्रिक कमकुवतपणा यावर चर्चा करण्यात आली. यावेळी तहसीलदार ठाकरे, नगरपरिषद अभियंता सोनटक्के, पंचायत समितीचे बीडीओ अरुण गिरीपुंजे, माजी नगरसेवक राजेश गुनेरिया आणि इतर अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर उपविभागीय अधिकारी गायकवाड यांनी स्वतः तलावाची पाहणी केली. पाहणीदरम्यान, बंधाऱ्याला नुकसान झाल्याचे आढळून आले.अनेक ठिकाणी भेगा आणि गळती आहेत. वेळेत दुरुस्ती केली नाही तर भविष्यात मोठी आपत्ती येऊ शकते.गेल्या काही दिवसांपासून स्थानिक नागरिक, पर्यावरण प्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते सोशल मीडिया आणि न्यूज मीडियाद्वारे या धोक्याबद्दल जागरूकता पसरवत आहेत.

लक्ष वेधले होते.ही बाब गांभीर्याने घेत पूजा गायकवाड यांनी तत्परता दाखवत सिंगाडा तलावाची तात्काळ पाहणी केली आणि त्याचे तांत्रिक मूल्यांकन केले, दुरुस्ती आणि मजबुतीकरणाचे काम लवकरच सुरू केले, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी इशारा फलक, बॅरिकेड्स आणि पाळत ठेवण्याची व्यवस्था केली काम पूर्ण होईपर्यंत परिसर सतर्क ठेवण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या.

सिंगाडा तलावाचे ऐतिहासिक महत्त्व सिंगाडा तलाव हे केवळ पाणी साठवण केंद्र नाही तर तिरोड्याचा एक पर्यावरणीय आणि ऐतिहासिक वारसा देखील आहे. पावसाळ्यात, शहराच्या भूजल पातळी राखण्यात हे तलाव महत्त्वाची भूमिका बजावते. यामुळे, बोअरवेल आणि विहिरींमधील पाणी स्थिर राहते. तसेच, हे क्षेत्र स्थलांतरित पक्षी,स्थानिक जैवविविधता आणि हिरवळी साठी एक आदर्श ठिकाण आहे.सिंगाडा तलावाचे रक्षण करण्याची जबाबदारी केवळ प्रशासनाची नाही तर प्रत्येक जागरूक नागरिकाची आहे. वेळीच उपाययोजना केल्यास संभाव्य आपत्ती टाळता येऊ शकते.

# बोनस नोंदणी ऑनलाइन पडताळणीसाठी शेतकऱ्यांकडून २५ टक्के रकमेची मागणी

**सालेकसा: –** तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी पूर्ण करून संबंधित सरकारी धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री केली. आता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात बोनस रक्कम जमा होण्याची प्रक्रिया सुरू असताना काही सोसायट्यांकडून नोंदणीच्या पडताळणीसाठी २५ टक्के रकमेची मागणी केली जात असल्याची तक्रार तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे केली आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार ज्या धान खरेदी केंद्रावरून त्यांनी ऑनलाइन नोंदणी केली त्या केंद्राच्या सोसायटीकडून त्यांच्या नोंदणी पडताळणीसाठी थेट बोनसच्या २५ टक्के रकमेची मागणी केली जात आहे. आधी २५ टक्के रक्कम भरा, मगच पडताळणी केली जाईल, असे स्पष्टपणे सांगितले जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

या प्रकारामुळे शेतकरी संतप्त असून, शासनाच्या योजना प्रत्यक्ष लाभाऐवजी भ्रष्टाचाराला वाव देणाऱ्या ठरत असल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. यापूर्वीही अशाच प्रकारे बोनस किंवा अन्य शासकीय योजनांच्या लाभासाठी बेकायदेशीर वसुलीचे प्रकार घडले आहेत. सरकारी योजनांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी त्यात दलाल हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शासनाने या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे केलेल्या तक्रारीतून केली आहे.

**सालेकसा तालुक्यात काही शेतकऱ्यांकडून यासंबंधीची तक्रार प्राप्त झाली आहे. त्यांच्या ऑनलाइन नोंदणीच्या पडताळणीसाठी काही सोसायट्यांकडून २५ टक्के रकमेची मागणी केली जात असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. या प्रकरणाची चौकशी सुरू असून यासंदर्भात पुढील कारवाईसाठी आम्ही पणन अधिकाऱ्यांकडे पत्र पाठवले आहे. दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.**

**– नरसय्या कोंडागुर्ले, तहसीलदार**

# अनुसूचित जमाती कल्याण समिती २९ पासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**गोंदिया :–** विधिमंडळाची अनुसूचित जमाती कल्याण समिती २९ ते ३१ जुलैदरम्यान जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. ही समिती तीन दिवसांत जिल्ह्यातील आदिवासी भागात राबविलेल्या विविध योजनांचा आढावा घेणार आहे. समितीच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील यंत्रणा कामाला लागली आहे. विधिमंडळाची अनुसूचित जमाती कल्याण समिती यापूर्वी ९ जूनलाच जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार होती; पण काही तांत्रिक कारणामुळे हा दौरा रद्द करण्यात आला होता. त्यानंतर आता ही समिती २९ जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. या संबंधीची सूचना समितीने जिल्हाधिकारी कार्यालय व संबंधित विभागांना दिली आहे. या समितीत एकूण १६ सदस्य असणार असून, त्यांच्यासह ११ अधिकारी व कर्मचारी राहणार आहे. ही समिती कर्मचाऱ्यांची जात वैधता पडताळणीची जिल्ह्यातील किती प्रकरणे आहेत, त्यापैकी किती वैध आणि अवैध ठरविण्यात आली व किती प्रलंबित आहेत, याचासुद्धा आढावा घेणार आहे. तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा, आरटीओ, अपर आदिवासी विकास कार्यालय यासह इतर विभागांचा आढावा घेणार आहे.

# सुशिक्षित बेरोजगार अभियंतासाठी काम वाटप समितीची सभा २४ जुलै रोजी

**गोंदिया :–** जिल्हा परिषद, गोंदिया मध्ये वर्गीकरण/नोंदणी केलेले सर्व पात्र सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना लॉटरी पध्दतीने ङ्गकाम वाटप सनियंत्रण समितीङ्ग जि.प.गोंदिया च्या माध्यमातून कामांचे वाटप करण्यासाठी दिनांक २४ जुलै २०२५ ला दुपारी १२ वाजता जिल्हा परिषद, गोंदिया चे मुख्य सभागृहात काम वाटप सनियंत्रण समितीची सभा आयोजित करण्यात आली आहे.वाटप करावयाच्या इतर माहिती कार्यालयाचे नोटिस बोर्ड व जिल्हा परिषद, गोंदिया बेबसाईट (ु.सिपवळर.सीं.ळप) वर प्रकाशित करण्यात आलेली आहे. तरी पात्र सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी न चुकता वरिलप्रमाणे आयोजित सभेला उपस्थित राहावे. कोणतेही कारण न देता काम वाटप करणे अथवा सभा रद्य करण्याचे अधिकार समिती अध्यक्ष तथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.गोंदिया यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

# प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्याकरीता जि.प.अध्यक्षांना साकडे



**अर्जुनी मोरगाव:–** तालुक्यासह जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत अर्जुनी मोरगाव तालुका शिक्षक संघाच्यावतीने जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांची भेट घेत बैठकीत शिक्षकांच्या अडचणींबाबत साकडे घालण्यात आले.

बैठकीत जिल्हा परिषद शाळांची सकाळच्या सत्रातील वेळ (७ ते ११.४०)पूर्ववत करणे, शिक्षक संवर्गाच्या पदोन्नती कार्यशाळा तत्काळ घेणे,जिल्ह्यातील नक्षलग्रस्ताच्या यादीतून वगळलेला भाग पूर्वरत करण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणे तसेच वगळलेल्या तालुक्यांच्या वेतन निश्चितीचा पुनर्विचार, इङज कामातून शिक्षकांची सुटका, चटोपाध्याय व निवडश्रेणी वेतनश्रेणीचा लाभ १२ व २४ वर्ष सेवा कालावधीनुसार देणे(प्रशिक्षण दिनांकानुसार नव्हे),चुकीच्या संचमान्यतेचा परिणाम झालेल्या शाळांची संच मान्यता दुरुस्त करणे,माध्यम बदल प्रकरणात १३ शिक्षकांना न्याय देणे व जि.प. शाळा बरडटोलीच्या अडचणींचे निराकरण करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढीकरिता प्रत्येक तालुक्यात आढावा सभा घेऊन प्रयत्न केल्याबद्दल तसेच शिक्षण व शिक्षक हितेशी कार्याबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष भेडारकर यांचा शिष्टमंडळाद्वारे शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

शिष्टमंडळाला उद्देशून बोलताना भेंडारकर यांनी अनेक समस्यांवर तत्काळ कार्यवाहीचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.सकाळ पाळीची वेळ लवकरच पूर्ववत करण्याचा निर्णय होणार असून, जिल्ह्यातून नक्षलग्रस्त मधून वगळण्यात आलेला जिल्ह्यातील भाग पूर्ववत करण्यासाठी शासन स्तरावर तात्काळ पाठपुरावा करण्यात येईल, पदोन्नतीसंदर्भातील कार्यशाळा या महिन्यातच घेण्यात येणार आहे. इङज कामाबाबत जिल्हा परिषदेकडून ठराव करून जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवण्यासह इतर मुद्यावर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.या सभेचे संचालन कीर्तीवर्धन मेश्राम व रमेश संग्रामे यांनी केले.प्रस्ताविक तालुका अध्यक्ष कैलास हांडगे यांनी केले.आणि कार्यक्रमाचे आभार किशोर लंजे यांनी मानले.

# आसोलीची पल्लवी झाली चार्टर्ड अकाउंटंट



**गोंदिया:–** चार्टड अकाउंटंट (सीए) परीक्षेचा निकाल ६ जुलै रोजी जाहीर झाला. यात गोंदिया तालुक्यातील आसोली येथील पल्लवी मोहनकर या विद्यार्थिनींनी ही परीक्षा उत्तीर्ण करीत आई–वडिलांच्या स्वप्नाची पूर्तता केली. पल्लवी सीए झाल्याने तिचे तालुक्यात सर्वत्र कौतुक केले जात आहे.

पल्लवी मोहनकर ही मूळची आसोली येथील रहिवासी आहे. पल्लवीचे वडील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असून, आई आरोग्य विभागात कार्यरत आहे. आपल्या मुलीने चांगले शिक्षण घेऊन सीए व्हावे अशी त्यांची इच्छा होती. यासाठी तिच्या आई–वडिलांनी तिला नेहमीच प्रोत्साहान दिले. पल्लवीचे इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण कामठा येथील सरस्वती शिशू मंदिर शाळेत झाले. यानंतर तिने पुढील शिक्षण आमगाव आणि नागपूर येथे घेतले. पल्लवी लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होती.

पल्लवीने सुद्धा आई–वडीलांच्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी कठोर परिश्रम व भरपूर अभ्यास करुन सीए होण्याचा संकल्प सोडला. जिद्द, चिकाटीने पल्लवीने सीए होण्याचे ध्येय बाळगत ते पूर्ण केले. ६ जुलैला सीए परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात पल्लवी उत्तीर्ण झाली. याची वार्ता आसोली गावात पसरताच कुटुंबीय व गावकऱ्यांनी तिचे कौतुक केले. पल्लवीने तिच्या यशाचे श्रेय वडील राजेश मोहनकर, आई कुंदा मोहनकर, भाऊ अर्पित मोहनकर यांना दिले आहे.

# आमगावातील युरियाची मध्य प्रदेशात चोरटी वाहतूक

## दोन कृषी केंद्रांवर कारवाई : ४५ पोती खताची वाहने जप्त




**गोंदिया :–** आमगाव येथून मध्य प्रदेशात रासायनिक खते परवानगीशिवाय वाहतूक करणाऱ्या दोन कृषी केंद्राच्या तीन वाहनांना कृषी विभागाने शनिवारी (दि. १२) सायंकाळी ६ वाजता पकडले. या कारवाईत वाहनांतून युरियासह इतर ४५ पोती रासायनिक खत जप्त करण्यात आले. यामुळे पॉझ मशीनवर नोंद न करता खतविक्री केल्याचे गंभीर प्रकरण पुढे आले. या संदर्भात आमगाव पोलिसांनी पाच जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

वाहन क्रमांक एमएच ३५–एजे ४३६२ या वाहनात मंगल कृषी केंद्र म्हाली (ता. आमगाव) येथून आरोपी शैलेंद्र सुरेंद्र दमाहे (रा. धनसा, ता. लांजी, जि. बालाघाट) हा २०:२०:०:१३ प्रकारच्या खताच्या १५ बॅग किंमत २१ हजार ८५० रुपये, वाहन क्रमांक एमएच ३५–एजे ३५२९ या वाहनात आरोपी शुभम रमेश येडे (रा. पाथरगाव, ता. बालाघाट) हा इफको कंपनीच्या खताच्या १३ बॅग किंमत १२ हजार ३५० रुपये व केपीआर कंपनीच्या सिंगल सुपर फॉस्फेट खताच्या ५ बॅग किंमत दोन हजार २०० रुपये तसेच वाहन एमएच ३१–डीएस २५९७ वाहनात जय दुर्गा कृषी केंद्र आमगाव येथून आरोपी विनोद अशोक तांभोरे (३३, रा. बिजली, ता. सालेकसा) हा चम्बल फर्टिलायझर्स युरिया खत ४ बॅग किंमत एक हजार ६४ रुपये, कस्तुरचंद फर्टिलायझर्स १८:१८:१० खत ४ बॅग किमत तीन हजार ८००, कृषिधन कंपनी २०:२०:०:१३ खत ४ बॅग किमत एक हजार ८०० रुपये असे सहा हजार ६६४ रुपये किमतीचे खरेदी केलेले विविध कंपन्यांचे खत एकूण किंमत ४३ हजार ६४ रुपये नेत होते.

याबाबत आमगावचे तालुका कृषी अधिकारी महेंद्र दिहारे (५५, रा. कटंगी) यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे त्यांनी लांजी रोड येथे तपासणी मोहीम राबविली.यामध्ये जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक संतोष सातदिवे, अनुविभागीय कृषी अधिकारी खुदीराम सनोदिया यांच्या उपस्थितीत तीन वाहनांची तपासणी करण्यात आली असत वाहनचालक बालाघाट (मध्य प्रदेश) येथील रहिवासी असून महाराष्ट्रातून मध्य प्रदेशात खत नेण्याचा परवानगी नसतानाही वाहतूक करीत होते. यावर त्या तीन वाहनांतून ४५ पोती युरिया जप्त करण्यात आला.

याप्रकरणी मंगल कृषी केंद्र म्हालीचे संचालक प्रकाश रोशनलाल अग्रवाल, जय दुर्गा कृषी केंद्र आमगावचे संचालक अशोक रामप्रसाद गुप्ता, शैलेंद्र सुरेंद्र दमाहे (रा. धनसा, ता. लांजी, जि. बालाघाट), शुभम रमेश येडे (रा. पाथरगाव, ता. बालाघाट) व विनोद अशोक तांभोरे (३३, रा. बिंजली, ता. सालेकसा) यांच्यावर रासायनिक खते नियंत्रण आदेश १९८५ मधील कलम ४(अ), ४ (ब), तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३(२) (डी), ३(२) (ई), ३(२) (एच) (आय) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक नीलेश डाबेराव करीत आहेत.



# ड्रोनने मोजणी झाली; गावठाणातील घर, जमिनीवर नावाची मोहोर लागली!



## क्षेत्रानुसार लाभार्थ्यांना मोजणी फी भरावी लागते

**ग्रामपंचायतला गावातील प्रशासकीय कामासाठी अभिलेख व गावठाणाचा नकाशा उपलब्ध होणार असून, गावातील मालकी हक्क व हद्दीबाबतचे वाद कमी होतील. ज्या मिळकतीचा अभिलेख तयार झालेला आहे त्यांचे क्षेत्रानुसार लाभार्थ्यांना मोजणी फी भरावी लागते.**

**गोंदिया :–** ड्रोन सर्वेक्षणाद्वारे प्रॉपर्टी कार्ड मिळवण्याची प्रक्रिया स्वामित्व योजनेंतर्गत केली जात आहे. या योजनेत ड्रोनच्या मदतीने गावातील जमिनीचे सर्वेक्षण करून त्या आधारावर मालकीचे कागदपत्र तयार केले जातात. यामुळे मालमत्तेच्या मालकीचे कायदेशीर पुरावे मिळतात आणि विविध सरकारी योजनांचा लाभ घेणे आता सोपे होणार आहे.ड्रोनद्वारे भूमापन जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील ६५५ गावांचे झालेले आहे. तर त्या नागरिकांना मिळकत पत्रिका प्रॉपर्टी कार्ड दिलेले आहे.

जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाकडील आकडेवारीच्या आधारे गावठाण भूमापनासाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या स्वामित्व योजनेंतर्गत जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील नागरिकांना मिळकत पत्रिका प्रॉपर्टी कार्ड देण्याची प्रक्रिया सुरू आहे. ड्रोन सर्वेक्षणामुळे गावठाणातील प्रत्येक मिळकतीच्या सीमा निश्चित होऊन एक नकाशा तयार होईल. स्वतःच्या मिळकतीचे नेमकं क्षेत्र माहीत होईल, त्याचे एक प्रॉपर्टी कार्ड तयार होईल आणि गावातील मालकी हक्क व हद्दीबाबतचे वाद कमी होतील. गावठाणातील प्रत्येक मिळकतीच्या सीमा निश्चित होऊन नकाशा तयार होईल, नेमके क्षेत्र माहीत होईल, मिळकत पत्रिका प्रॉपर्टी कार्ड तयार होईल. ग्रामपंचायतकडील मालमत्ता कर निर्धारण पत्रक (नमुना ८ नोंदवही)

स्वयंचलनाचे तयार होईल, महसुलात वाढ होईल, ग्रामपंचायतच्या खुल्या जागा नाले यांच्या सीमा निश्चित होऊन अतिक्रमण रोखता येईल. मिळकत पत्रिका तयार झाल्यामुळे मिळकतीस तरलता प्राप्त होईल, कर्ज घेणे सोयीचे होईल. ग्रामपंचायतला गावातील प्रशासकीय कामासाठी अभिलेख व गावठाणाचा नकाशा उपलब्ध होईल, गावातील मालकी हक्क व हद्दीबाबतचे वाद कमी होतील.